रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर हे ता. १ माहे आगष्ट रोजी परत उमरावतीस आले. त्यांचा मुंबई, पुणें, नाशीक, भुसावळ वगैरे ठिकाणीं फार उत्तम प्रकारचा आदर सत्कार झाला. ह्या सर्व ठिकाणीं त्यांना मोठ मोठ्या टेलिजंग मेजवान्या मिळाल्या व इतर सर्व प्रकारचा मान मिळाला. वऱ्हाडांत ही हे ज्या गाडीनें गेलें त्या वेळेस आपले शक्तिनुसार त्यांची उतराई होण्या करितां ठिकठिकाणीं लोकांनीं त्यांना पानसुपारि हारतुरे वगैरे दिले अकोल्याचे स्टेशनावर त्यांना परवा पानसुपारी झाली व येत्या रविवारी गावांतील मंडळी मि. जोशी व मुधोळकर या उभयतास मोठी थाटाची पानसुपारी व मेजवानी देणार आहेत देश हिताकरितां झटणारे या लोकांचा किती जरी गौरव केला तरी थोडाच आहे.

मे. कमिशनरसाहेब येथें लवकरच येणार आहेत.

रा. रा. गणेश बापूजी यांनीं येथील तहशीलदारीचा चार्ज मागील आठवड्यांत घेतला व रा. रा. कृष्णाजी अनंत यांची मुर्तिजापूरास नेमणूक झाली व त्या प्रमाणें ते शुकरवारी दिवसाचे गाडीनें तिकडे रवाना झाले.

हैद्राबादच्या एका अधिकाऱ्यांस सास्पेंड केलें. — हैद्राबाद ( निजाम ) येथील एकदा असलेलें डेप्युटी अकौंटंट जनरल आणि अलीकडे नलदुर्ग प्रांताचे डेप्युटी कमिशनर गयाप्रसाद ह्यांस कामावरून बरेच दिवसां पासून सास्पेंड केले आहे. सर सालरजंग यांच्या कर्जाची चवकशी करण्या साठीं बसलेल्या कमिशनापुढें गयाप्रसाद यांची साक्ष, गेल्या अक्टोबर महिन्यांत, झाल्यावर, सनद्यांतून पहिल्या सर सालारजंगांच्या कर्जा बद्दल निरनिराळ्या सावकारांना जी खतें करून देण्यांत आलीं, त्या संबधानें, झाली, व त्याना जे साक्षीकरितां बोलावून आणिलें त्यानवर पुनः त्यांचे जागेवर जाऊन रुजू होण्यास त्यांना हुजूरचा हुकूमच होत नाहीं व असें करण्याचे कारण काय तेंही त्यांस कळविण्यांत येत नाहीं त्यामुळें गयाप्रसाद हे अक्टोबरपासून निरुद्योगी घरींच बसले आहेत. हैद्राबादची तारीख २६ जुलै ची तार.'

## वर्तमानसार

वकीलीच्या परीक्षेस स्कूल फायनल परीक्षाही चालेल असें सरकारानें ठरविल्याचे समजतें. फार चांगलें झालें. आतां म्याट्रिक्युलेशन फक्त कालेजांत जाणारांस लागणार.

राणीखेत व नयनीताल या ठिकाणी पटकी उठली आहे.

मि. वामन नानाजी शिंदीकर यांस नाशिक जिल्ह्यांत वकीली करण्याची सनद मिळाली.

नव्या मनुष्य गणती संबंधानें गेल्या सरकारी ग्याझेटांत कांहीं नियम प्रसिद्ध झाले आहेत.

सिमल्यास सोन्याली बाजारांत पटकी उठली आहे असें म्हणतात.

प्रो. व्हामबरी हे इतक्यांत हिंदुस्थानांत व्याख्यान देण्या करितां येणार आहेत.

रशियांत लवकरच एक लटकी लढाई होणार आहे.

जर्मन प्रधान व्हानसेल्टकी हे दारूचे कट्टे शत्रु आहेत असें म्हणतात. आमच्या इकडे त्या देवींचे भक्त वाढत आहेत.

इजिप्त मधील इंग्रजी फौजेपैकीं कांहीं लोकांस लवकरच फाटा मिळणार असें म्हणतात.

कैरो येथील इंग्रजी फौजेंत बराच आजार उठला असून आजूबाजूच्या खेड्यांत देवीचा रोग सुरू झाला आहे.

इजिप्त मध्यें पुन्हा दंगा करणारा महादी आपल्या मांडलीकांस एकत्र बोलावून लढाई करण्याची तयारी करीत आहे,

उत्तर ब्रह्मदेशांत शान नांवाच्या संस्थानांत अज्ञान बंडाळी सुरू असून त्या बंडखोरास चीनच्या व्यापाऱ्यां कडून बंदुकी पुरविण्यांत येतात असें ह्मणतात

जर्मनी व इग्लंड यांच्यांत आफ्रिके संबधानें जो तह झाला आहे तो लार्ड सभेपुढें आला.

लष्करी लोकांसाठीं ज्या बराकी बांधलेल्या असतात त्यांत जास्त सुधारणा व्हावी असें विलायतेंत वाटत आहे. टा० आ०

महाराणीनें आपल्या अमिरांस विचार करण्या करितां बोलाविलें होतें.

चिपळूण येथें ९५० खोत लोकांची सभा ता. २१ रोजीं भरली होती त्याबेळेंस मुंबई सरकारास एक अर्ज पाठीवण्याचे ठरलें.

मि, डब्ल्यु. एस. केन हे नोवेंबरांत येथें येणार आहेत.

रशियन सरकार ज्यु लोकांस अपले सरहद्दीबाहेर घालवून देत आहे व अशा निराश्रित लोकांस आस्ट्रियन सरकार आपले राज्यांत वसाहातीस जागा देत आहे.

महामारीचा प्रसार—ह्या बाई व्हालेंसिया प्रांतांत गेल्या आहेत व आपल्या प्रतापानें व्हालेंशियाच्या आसपासचा सर्व प्रदेश उद्ध्वस्त करीत आहेत

सानसालव्हाडोर येथील रिपब्लिकमध्यें या दर्वी माजून कांहीं रक्तपात झाला. प्रेसिडेंट मेनेनडेझ हे ह्रदयव्याधीनें परलोकवासी झालें असें समजतें.

सर्व पृथ्वीचे पाठीवर एकंदर सहा लक्ष मैल तारायंत्राचा पसार झाला आहे असें समजतें. सु. प.

बांबूची वाढ —फार जलद होते अशी जो समजूत आहे ती, सिलोन मध्यें गेल्या एप्रील महिन्यांत चोवीस तासांत १३॥ इंच बांबू वाढला अशीं प्रत्यक्ष घडलेली गोष्ट प्रसिद्ध झाली आहे तिजवरून खरें वाटतें.

पार्लमेंट सभा तारीख १२ आगस्ट रोजीं बंद होणार आहे.

सन १८८९, ९० साल अखेर भागीनें काम करणाऱ्या मंडळ्या मुंबई इलाख्यात २१९ होत्या, व त्यांचे व्यापारांत असलेले भांडवल १०,१९,६४,३९६ रुपये आहेत असें वार्षिक रिपोर्टा वरून समजतें.

येत्या हिवाळ्यांत अटक येथें घोडे स्वारांची मोठी कवाईत व्हावयाची आहे, तिच्या करितां सरकारानें ६ लक्ष रुपये खर्च करण्याची मंजूरी दिली

गेल्या मे महिन्यांत कलकत्ता बंदरातून परदेशीं १४७० मजूर गेले पैकीं ९७२ फिजी बेटांस ३३६ नेटल येथें व ५६२ मारिशस बेटांत गेलें.

पार्लमेंट मेंबर मि. सचवान हे आपल्या पत्नीसह येत्या हिवाळांत हिंदुस्थानांत येणार असून राष्ट्रीय सभेच्या सेशनास हजर राहणार आहेत असें समजतें ग्रु.सू.

कायद्यांत स्त्रीपुरुषांचा संभोग काळ १० वर्षांपासून धरला आहे ह्यामुळें पुष्कळ अल्पवयी मुलीवर घोडनवऱ्यांकडून जुलूम होतो; या साठी ही वयाची यत्ता कायद्यांत १४ वर्षांची करावी असा मद्रासेतील लोकांनीं सरकारास अर्ज केला आहे.

जपानांतील कापसाच्या गिरण्यांना फायदा होत नाहीं, म्हणून त्या पटापट बंद होत आहेत.

कोंडवाड्यांचा चालू कायदा सुधारून त्यांत फेरफार करण्याकरितां मुख्य कायदे कौन्सिलांत एक मसुदा प्रविष्ट झाला आहे. त्यांतील मुख्य फेरफार हा आहे कीं अतिक्रमण करणाऱ्या गुरांच्या मालकांस कडक शिक्षा दिली जाईल, ज्या पाशी गुरें आहेत अशा गरीब शेतकऱ्यांची काय अवस्था होईल? क० त०

युरोपाची भयानक स्थिती— युरोपांत जेव्हां यादवी माजेल तेव्हां किती राष्ट्राचा होम होईल, वं किती मनुष्य प्राण्यांचा संहार होईल हे आज सांगतां येणें अवश्य आहे. युरोपांतील एकंदर राजापाशीं मिळून ९,४०,००,००० शिकलेली लढाऊ फौज तयार आहे, मग दारूगोळा, हत्यारेपात्यारे वगैरे लढाऊ सामानाचा किती पुरवठा असेल ह्याची नुसती कल्पना केली तरी युरोप ह्मणजे दारूचें भांडार आहे असें सहज मनांत येतं. ह्या प्रचंड भांडारांत ठिणगी केव्हां पडेल हे एक परमेश्वरास ठाऊक. शांततेच्या वेळीं प्रत्येक राष्ट्रापाशीं इतकी फौज आहे रशिया ८७७०००, फ्रान्स ५१२०००, जर्मनी ४९२०००, आस्ट्रिया हंगारी २९-०००, इटाली २१००००, इंग्लंड २-२१०००, टर्की १८२०००, स्पेन १३१-०००, हालंड ६६००० बेलजम ४१००० डेन्मार्क ४३०००, रुम्यानिया ३५००० नार्वे व स्वीडन ३३००० बल्गेरिया ३२-०००, ग्रीस २६०००, पोर्तुगाल २४००० सर्व्हिया १३००० लढाईच्या वेळीं रशिया २६०००००, फ्रांस ४१०८०००, जर्मनी ३२०००००, आस्ट्रिया हंगारी २१८१०-०० इटली २६२६०००,

शोचनीय मृत्यु— ! आह्मास लिहिण्यास परमावधीचे दुःख वाटतें कीं महाराज होळकर सरकार यांचे कनिष्ट बंधु महाराज यशवंतराव उर्फ छोटे बाळासाहेब यांना गेल्या बुधवारी रात्रीं इंदुर मुक्कामी सन्निपात तापाच्या योगानें देवाज्ञा झाली! यशवंतराव होळकर हे शिवाजीराव होळकर सरकार यांचे सापत्न बंधु ह्मणजे गंगाभागीर्थी श्रीमती राधाबाई साहेब यांचे चिरंजीव असून यांचे वय सरासरी ३० वर्षांचें होतें.

## अकोले बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००– |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००= |
| सुवर्ण.... | २१ | रुपे | १०८ |
| आळशी खंडीस | ८४ | उडीद | ६० |
| गहू काठे | ६१॥ | बनशी | ६७॥ |
| जवारी नवी | ४३ | चणे | ६२॥ |
| रुई | सर्की ४ | मोठ | ४। |
| | तूप ९।= | तेल | ४॥।= |

सध्याचे भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४४॥। |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५९॥। |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ८१॥– |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५८॥। |
| सर्की | वै. नव सालाची | १९४७ | ३॥।= |

## जाहिरात.

विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

किंमतीशिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

स्त्री शिक्षण व इतिहास वगैरे पुस्तकांस मोठमोठ्या विद्वानांनीं उत्तम असें आपले पुष्कळ अभिप्राय दिलेले आहेत त्या पैकीं खालचा हा एक आहे.

Mr. G. M. Sathe, Registar of native publications in his report to Govt. for the year 1888 says:— "Among the Historical works of the year, History of the native states, chapter I, by Mr. Limaye, gives much useful information."

### १ सौभाग्य मंदीर.

[ भाग पहिला. ] किंमत ०१२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषय .

१ स्त्रियांची योग्यता, २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म, ३ स्त्रियांचें भूषण, ४ स्त्रियांचे दूषण ५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी, ६ स्त्रियां वरील कांहींविशेष प्रसंग, ( पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी ) ७ शांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रांस उपदेश, १३ शकुंतलेचें राज सभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मी गर्व परिहार, १६ रुक्मिणीची पत्रिका, १७ सिता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनाचा मोठेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा मनोरंजक संवाद २४ स्त्रियांचें परावलंबन'

२ स्त्री शिक्षण ज्ञानमाला.... .... ....०१२

या पुस्तकांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रियांस वाचण्यास योग्य असे पुष्कळ विषय निबंधरूपानें दिले आहेत.

३ संसार दर्पण.... .... .... ....०१०

याही पुस्तकांत स्त्रियांच्या संबंधानें बोधपर असें पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय आहेत

४ मुलींची सासरीं वागणूक.... .... ....०६

५ सासुरवास चंद्रिका. ( पूर्वभाग ) ०७

६ सदरचा ( उत्तर भाग. ) .... .... ०५

इतिहास विषयक पुस्तकें.

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास........०६

२ श्री सेतुबंध रामेश्वर वर्णन........०२

नेटिव राजांचा इतिहास

( भाग पहिला. ) किं. ०१४ आणे.

खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर ४ किसनगड, ५ धोलपूर, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोटा, ९ टोंक, १० केरवली, ११ शिरोही, १२ जेसलमिर, १३ रेवा १४ उर्वा किंवा तेहरी, १५ दतिया, १६ सावन्तुर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास २१ जावरा.

नेटिव राजांचा इतिहास.

( भाग दुसरा ) किंमत १२ आणे.

यांत ६ संस्थानांचा इतिहास आहे.

१ उदेपूर. २ जयपूर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर, ६ जव्हार.

मनोरंजक विषयांचीं पुस्तकें.

१ संगीत गोपिचंद नाटक.... .... ... ०९

२ गारुडी लोकांचा खेळ.... .... .... ०६

३ स्त्रियांची मंगल कार्यें
अथवा
डोहाळे जेवण आणि
हळदी कुंकूं. .... .... ....०६

४ स्त्रियांचें नेत्र कटाक्ष.... .... .... ०३

५ न्हाणवली आणि ऋतुशांती.... .... ०५

६ स्वतंत्र विधवा व त्यांच्या तरुण मुली०५

७तरुण बायको
अथवा
स्त्रियांची स्वतंत्रता .... .... ........०५

८ तरुण स्त्रियांची मौज..............०५

९ सावित्री आणि पुरुषोत्तम
अथवा
अनाचाराचा परिणाम ........०५

१० बकावली........................१०४

शाळांतील लहान मुलांस उपयोगी पडणारीं पुस्तकें.

१ अंकगणितसार ( भाग पहिला. ) ०३

२ तोंडचे हिशेब ( भाग दुसरा. ) ०१०२

३ हिंदुस्थानचा भूगोल................०१

४ महाराष्ट्र देशाचा इतिहास............०१

५सदरची जंत्री ........................०१

६ अंकलिपी. ( सचित्र. )..........०१०६

या शिवाय आह्माकडे आणखी दुसऱ्या तऱ्हेची पुस्तकें मिळतील व्यापारी लोकांस चांगले कमिशन देऊं

हीं सर्व पुस्तकें उमरावती येथें "प्रमोदसिंधु" छापखान्यांत व खाली सही करणार यांचे कडे रोख किंमतीनें अगर व्ह्याल्युपेबलनें मागविलीं असतां पाठविली जातील.

वि० जी० लिमये.

पत्ता:— कांदेवाडी मुंबई गिरगांव पोष्ट.

हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हांशील रु१३
सहामाही ३ " ३ "
सालअखेर " ७ " १रु८
किरकोळ अंकास..............................रु४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस रु१रु६
दुसरें खेपस ........रु१

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy...............................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3a

VOLXXIV — AKOLA MONDAY AUGUST 11 1890 — NO 31

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख ११ माहे अगष्ट सन १८९० इ० — अंक ३१

डा. वामन गोपाळ यांचा अनेक औषधिमिश्रित

## सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असुन खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व सांधेगत गायुवर तसेच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कल्प

हा कल्प प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गीतमराव केशव, मुंबई.

## जाहिरात.

नमुना नंबर १४२
दिवाणी कोर्टास सुचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटिफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्रमाणें

अर्जीचा नंबर कि. क्लास नंबर १३
मि. नंबर ४ सन १८९०
वि. स्पे.अ. कमिशनर साहेब जिल्हा
अकोला यांचे कोर्टांत

अर्जदार शमसोद्दीन खान बापाचे नांव रसुलखान जात रोहिला राहणार खामगांव

वरील अज्ञान शमसोद्दीनखान बापाचे नाव रसुलखान जात रोहिला राहणार खामगांव तालुके मजकूर जिल्हा अकोला याचे पालन व माल मिळकतीच्या कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तैवज वरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारण वरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं. त्यांणीं तारीख २१ माहे आगष्ट सन १८९० इसवी रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळी ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी तारीख ४ माहे आगष्ट सन १८९० इसवी.

M· Yashinkha.
स्पे० अ० कमिशनर

## जाहिरात.

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६३ चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें. मि. क्लास नंबर १९ मि. नंबर १ १८९०.

विद्यमान स्पे. अ. कमिशनर साहेब जिल्हा अकोलो यांचे कोर्टांत.

नाव, बखत्यारखान

बापाचे नांव फत्तेखान अ० पा० चु० शमसोद्दीनखान.

राहणार खामगाव तालुके मजकूर.
जिल्हा अकोला यांस मयत

अ० बखत्यारखान बापाचे नांव फत्तेखान रोहिला राहणार खामगाव. तालुके मजकूर जिल्हा अकोले याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून सदर्हू अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहीरातीद्वारे कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख २१ माहे आगष्ट सन १८९० इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ४ माहे आगष्ट सन १८९० इ.

M. Yashiokhan
सी. जज्य

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १८१२

शहरांत अथवा गांवांत स्वच्छता ठेवणें, आरोग्य राहील अशी व्यवस्था ठेवणें, रस्ते साफ ठेऊन रात्रीं घरावाहेर उजेड ठेवणें इ० कामांची चोख बजावणी व्हावी ह्मणून म्युनिसिपालिटी सारख्या संस्था स्थापित करण्याचा मुख्य हेतु दिसतो व तो हेतु सिद्धीस ही जात आहे परंतु चंचुप्रवेशः मुसलप्रवेश या न्यायानें आमच्या दयाळू सरकारनें आपले बरेंच हातपाय पसरून दुसरी बरीच जबाबदारीची कामेंही संस्था लोकनियुक्त झाल्यापासून हिच्यावर लादण्याचा संकल्प केला आहेसा दिसतो. प्राथमिक व कांहीं ठिकाणीं मध्यम प्रतीचे शिक्षणाची व दवाखान्यांच्या खर्चाची जबाबदारी ह्या संस्थेवर टाकून सरकारनें आपला हात बहुतेक काढून घेतलाच आहे. हें करणें सरकारास उचित आहे किंवा नाहीं हें पहाण्याचा हा समय नाहीं परंतु आपल्या मनांतील हेतु तडीस नेण्यास सरकारचे प्रयत्न किती सावकास रीतीनें चालले असतात व लोकांस न दुखवितां पिशवीचें तोंड बंद करण्याकडे कसा प्रयत्न चालू असतो ह्याचा विचार आमच्या लोकांनी करण्या सारखा आहे व ह्या पासून पुष्कळ शिकण्या जोगे आहे. असो.

मुंबईस शिक्षण संबंधीं खर्च दिवसे दिवस वाढतच चालला असल्या कारणानें सरकारनें आपली मदत वाढविण्याचें नाकारलें आहे व त्या शहरच्या मु. कमेटी वरच सर्व जबाबदारी ठेवण्याची सरकारची इच्छा आहे व त्या बद्दल जर अधिक कर बसवावा लागला तर सरकार आपली नाखुशी दाखविणार नाहीं. सरकारनें आपल्या १८८१ सालच्या आक्टोबर महिन्यांतील खालित्यांत स्पष्ट लिहिलें आहे कीं, शिक्षण संस्था कमेट्यांच्या स्वाधीन करून लोकांवरील कराचा बोजा वाढवावा असा सरकारचा मुळींच उद्देश नाहीं. व जेव्हां लोक शिक्षणास अधिक पैसा खर्च करण्याचा प्रसंग येईल तेव्हां सरकार आपली पिशवी खुली ठेवील. परंतु सरकार नेहमीं प्रमाणें हेंही आपलें वचन मोडणारेंसें दिसतें. मुंबई म्यु. कार्पोरेशन आपल्या शिरावर सर्व खर्च संभाळण्याची जबाबदारी घेण्यास नाखुश आहे व पोलीस खात्या करितां जो पैसा कमेटीस सरकारांत भरावा लागतो तो शाळा खत्यास लागणाऱ्या खर्चांत वजा करून शिल्लक सरकारांत जमा करण्याची आपली इच्छा दर्शविली आहे मुंबईचे म्यु. कार्पोरेशन सरकारशीं टक्कर मारण्यास समर्थ आहे व सहसा सरकारचें ह्मणणें कबूल करणारही नाहीं. परंतु ही सरकारची गदा जर दुसऱ्या कमेट्यांवर फिरली तर मात्र अगोदरच गरीब व करानें जेरीस आलेल्या प्रजेस बऱ्याच वेणा द्याव्या लागतील. व एखाद्या नवीन करास लढून घेण्यास लवकरच तयारच व्हावें लागेल.

त्याच प्रमाणें सांतीचे व स्पर्श जन्य रोगा करितां मुंबईच्या म्यु. कमेटीस एखादी नेहमीची सोय करण्याचा सरकारचा हुकूम सुटला आहे व हल्लीं असलेल्या दवाखान्यातून असल्या रोग्यास थारा यापुढें देण्यांत येणार नाहीं व कमेटीचें ह्मणणें असें आहे कीं अशा रोगांची साथ शहरात आली तरच कमेटी त्यावेळेपुरती व्यवस्था करील, अशा रोग्याकरितां निराळे दवाखानें स्थापण्यास जागा मिळणें नाहीं. करितां त्यांची तपासणी घरोघर जाऊन करण्यास कमेटी कबूल आहे.

निराळी व नेहमीची व्यवस्था ठेवण्यास कमेटीस जड जाईल. करितां हल्लीं असलेली व्यवस्था कायम ठेवावी व सरकार जर नच ऐकेल तर सद्यां असलेल्या दवखान्यास कमेटी कडून होत असलेली मदत नवीन व्यवस्थे करितां बंद करावी लागेल इ० मुंबईची कमेटी सहसा सरकारचें गैरवाजवी ह्मणणें कबूल करणार नाहीं व जरि तिला ते कबूल करावें लागलें तरी ती श्रीमंत असल्या कारणानें तीला जड़हा जाणार नाहीं परंतु दुर्दैवानें दुसऱ्या म्यु. कमेट्यांवर जर हलके हलके ही धाड आली तर मात्र मोठें कठीण जाणार आहे ती कमेटी श्रीमान असल्या कारणानें तिच्यावरच ह्या दोन खात्याचा खर्च लादला आहे असें सरकारचें ह्मणणें आहे परंतु सरकारास आपल्या हिताकरितां एखाद्यास श्रीमंत किंवा गरीब ह्मणण्यास मुळीच उशीर नसतो तेव्हां इतर म्यु. कमेट्यांस आपल्यावरही हा नवीन बोजा नाहीं बसणार असें खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं.

निमंत्रण केल्याप्रमाणें रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर व जोशी हे उभयता येथें आले व पूर्वी ठरल्या प्रमाणें रविवारीं सकाळीस सार्वजनिक पानसुपारि झाली पानसुपारीस फक्त मि. मुधोळकरच आले होते. मि. जोशी यांचे प्रकृतीच्या अस्वस्थतामुळें व दुसऱ्या कांहीं अडचणी मुळें पानसूपारीला येणें झालें नाहीं व त्या बद्दल दुःख प्रदर्शक त्यांनीं चिठी मंडळीला पाठविली होती. लायब्ररींत सुमारें शेट सावकार वकील इतर स्वतंत्र धंद्याचे लोक मिळून सरासरी ३०० वर मंडळी जमली होती त्यांत सरकारी नौकराचा एक चेहरा दृष्टीस पडला नाहीं असें म्हटलें असतां चालेल. व ह्या कालच्या प्रसंगावरून सरकारच्या मदती शिवाय लोकांना काम करितां येईल किंवा नाहीं याची बरीच साक्ष पटत आहे. रा. रा. मुधोळकर हे लायब्ररींत ७॥ वाजतां आले ते आल्याबरोबर त्यांच्या स्वागतार्थ हारमोनियमवर सुस्वरपद्यें गाण्यास मुलानीं सुरवात केली व सर्व मंडळीनीं त्यांना मोठे सन्मान पूर्वक उत्थापन दिलें व नंतर सभारंभाचा कामास सुरवात झाली. रावसाहेब देवराव विनायक वकील यांची अध्यक्षाचे जागीं सर्वानुमतें योजना करण्यांत आली रावसाहेब ह्मणाले कीं ह्या प्रसंगास दुसऱ्या कोणाची योजना झाली असती तर बरें झाली माझी तरी सर्वांची आज्ञा मला मान्य आहे असें सांगून सभारंभाचा उद्देश कळविला व राष्ट्रीयसभा कोणाची आहे तिचे मागणें किती रास्त आहे व ती सरकाराला व सर्व इंग्लिश लोकांना किती संमत आहे या बद्दल थोडक्यांत माहिती दिली व त्याचप्रमाणें इकडील कांहीं सरकारि नौकरांचे तिजविषयीं व तिच्या चालकाविषयीं जें ग्रह आहेत ते अगदीं व्यर्थ व अविचाराचे आहेत असें ते ह्मणाले. त्यानंतर पिंपळगांव येथील सवदागर यांनीं उडदुत व रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे व पांडुरंग बापुजी राजंदेकर यांनीं मराठींत भाषणें केलीं. ह्या तीन गृहस्थांनीं; रा. रा. मुधोळकर यांनीं आपल्या इतर सर्व गोष्टीचा त्याग करून केवळ लोककल्याणार्थ जो प्रवास केला त्याबद्दल व राष्ट्रीय सभे सारख्या महत कार्यास मदत केली व ईश्वरानें या कामांत त्यांना बरेंच यश दिलें याबद्दल, आनंद प्रदर्शित केला व सर्वांनीं आपल्या शक्तीनुसार देश सेवेकरितां झटावें असें सांगितलें त्यानंतर पेठेंतील सावकार मंडळींनीं त्यांना बऱ्याच व्यापाऱ्यांच्या सहींचें एक मानपत्र दिलें व गांवातील सावकार रा. रा. बालचंद्र बनसीलाल व बेहारीलाल यांनीं एक शालजोडी त्यांना दिली. त्यानंतर रा. रा. मुधोळकर यांनीं ह्या दिलेल्या मानाबद्दल सर्वांचे प्रथम आभार मानून ह्मणाले कीं मी ह्या मानास योग्य नाहीं कारण मी जें काम केलें आहे ते कांहीं जास्त केलें असें नाहीं आपल्या देशाच्या कल्याणाकरितां खटपट करणें हे प्रत्येक शाहण्या मनुष्याचें काम आहे व तेंच मीं केलें ह्या वऱ्हाडांत मी केवळ एकटाच ह्या कामाकरितां झटतो असें नाहीं तर-आज समाजास जी मंडळी जमली आहे त्यापैकीं माझे मित्र रावसाहेब देवराव विनायक. रा. रा. गोविंद विश्वनाथ, पांडुरंग बापूजी, शंकर गोविंद, देसाई वगैरे माझे प्रमाणेंच ह्या कामाला झटतात व त्यांच्या जवळून मी मान घेणें अगदीं रास्त नाहीं. मी तिकडे मेच्या १० व्या तारखेस जाऊन पोंहोचलों व आगष्टपर्यंत राहूं असा प्रथम अजमास वाटला होता परंतु हवा पाण्याच्या मानानें हे दिवस अशा समांन योग्य नसल्या मुळें अह्माला लवकरच परत यावें लागलें मी एकंदर २० ठिकाणीं सभा केल्या सभेला ५०० पासून ते हजार पर्यंत लोक जमत असत प्रत्येक सभेंत राष्ट्रीय सभेचे मागणें रास्त आहे व हिंदुस्थानाच्या लोकांना त्यांच्या राज्यकीय कारभारांत कांहीं तरी हक्क मिळाले पाहिजेत असे ठराव पास झाले व ज्या वेळेस ह्या सरकारि कायद्याचा विचार करण्याचा प्रसंग येईल तेव्हां आह्मी मदत करूं असें सर्वांनीं अश्वासन दिलें आहे तिकडे केवळ अमुकच पक्षाच्या लोकांची मदत मिळाली असें नाहीं. कानसरव्हेटीव व लिबरल या उभयपक्षांच्या लोकांनीं मदत देण्याचें कबूल केले आहे व त्यापैकीं लिबरल लोकांचो विशेष मदत आहे लिबरल पक्षाचे मुख्य मि. ग्ल्याडस्टन साहेब यानींही हिंदुस्थानला मदत करण्याचें अश्वासन दिलें आहे.

माझ्या व इतर प्रतिनिधी जाण्यापासून बरेंच काम झालें आहे. सरकारचें बिल जें आपणास आजच्या स्थितीस योग्य नाहीं तें जरि ह्मणून अद्याप पाडलें गेलें नाहीं तरी निदान त्याचा विचार करण्याचें लांबणीवर टाकलें आहे व त्याला कदाचित वर्षेपेक्षां सुद्धां जास्त काळ लागणार आहे. आपणाला पाहिजे तसा कायदा जरि सध्यां मिळत नाहीं तरी आपणाला अनिष्ट असा तात्काल होणारा कायदा लांबणीवर पडला ही गोष्ट कांहीं लहान नाहीं. राज्यकीय हक्क मिळण्याचें काम फार कठीण आहे व ते एकदोन महिन्यांत किंवा वर्षांत होईल असें नाहीं. त्या पाठीमागें आपण लागलें पाहिजे आहे ह्मणजे आपणाला कधींना कधीं तरी यश येईल मात्र आपण आंगीं गांभीर्य व धैर्य ठेविलें पाहिजे उदाहरणार्थ आपण एकदा चुलींत लाकडें घातलीं व स्वस्थ बसलो ह्मणजे कांहीं स्वैपांक तयार होत नाहीं. वारंवार ती पुढें केली पाहिजेत व एकदा लावलेली संपली तर दुसरी लावली पाहिजेत ह्याच मासला सर्वत्र लागू आहे. त्या शिवाय आपणाला ह्याकामांत बायकांची सहचरिा या नात्यानें बरीच मदत पाहिजे आहे व ती मिळण्या करितां स्त्रिशिक्षण अवश्य दिलें पाहिजे आहे व त्याच प्रमाणें सर्व लोकांचें शिक्षण जितके वाढेल तितकें वाढणें अगदी अवश्य आहे व ह्या करित खटपट करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

यानंतर अध्यक्षाचें थोडेसें बोधपर भाषण होऊन मुलांचें गायन झालें व पानसुपारी हारतुरे वगैरे वाटणें झाल्यावर सर्व समारंभ फार सुरेख रीतीनें तडीस गेला. यानंतर मि. भागवत यानी आपल्याघरी मि. जोशी व मुधोळकर यास निमंत्रण केल्यावरुन ते व गावातील इतर ५०।६० सभ्य गृहस्थ भोजनास गेले. येणेंप्रमाणें कालचा दिवस येथें फार आनंदात व उत्साहात गेला.

---

महारोगा सारखी व्याधि मनुष्यास जडणें म्हणजे ईश्वरीक्षोभ होय. हे रोग दुसाध्य: आहेत इतकेंच नव्हे संपर्कानें इतरास हो जडतात, आणि त्या मुळें व्याधिग्रस्त प्राणी हतभागीतर खराच परंतु त्याच्या सोयऱ्याधायऱ्यावर ही त्याच्या दुखण्यानें मोठें संकट ओढवतें. प्रेमपाश तोडून त्यांनां त्यास दूर करावें लागतें. आणि हल्लीं जो नवीन कायदा होण्या विषयी घाटत आहे व शेंकडा शंभर हिश्यानें जो पसार होईल त्या कायद्यान्वयें महारोग्याच्या आप्तइष्ट मंडळीस त्यास दृष्टी आड आपल्या समाजाच्या मर्यादेच्या बाहेर पाठवावें लागेल कांकीं रक्त पिती किंवा कुष्ट झालेल्या मनुष्याच्या प्रत्यक्ष स्पर्शामुळें किंवा त्याच्या वस्त्रप्रावरणादि वस्तूंच्या व स्थलादिकांच्या स्पर्श संचारानेंही सार्वजनिक आरोग्यास मोठा धक्का पोंचतो असें अनुभवास येत आहेत.

तेव्हां अशा अनाथ प्राण्याचा वाली कोण? ईश्वरी नेमानेम असा आहे कीं मनुष्यानेंच मनुष्याची उणीव दूर केली पाहिजे आणि म्हणून मानवी स्वभाव नाना विध प्रवृत्तीनें परिपूर्ण आहे. रोगी मनुष्यास वेगळें करणें म्हणजे भूतदया नव्हे तरी बहुतांच्या सुखासाठी थोड्यावर कमी उपकार करणें हें ही भूत दयेनेंच भाग पडतें मुंबईस शेंकडों लोक स्पर्शजन्म रोगांनी पिडलेले आहेत आणि त्या मुळें इतर लोकांस या रोग्या पासून भिती आहे म्हणून महारोग्या साठीं एक मोठी धर्मशाळा मुंबईच्या आसपास निघणार आहे. मुंबईचे विख्यात शेट दिनशा माणिकजी यांनीं या कृत्यास उदार आश्रय दिला आहे आणि या थोर गृहस्थाच्या नांवानें ही धर्मशाळा नाणवली जाणार आहे. ही धर्मशाळा तयार होईपर्यंत सध्यां पुरती एक छोटी इमारत तयार करण्याविषयीं गेल्याच्या मागील शनिवारी जाहीर सभा भरून ठराव झाला आहे. त्या सभेच्या वेळींच बारा हजारावर आंकडे पडले आहेत. 'दिनशा माणिकजी धर्मशाळें'त औषधपाणी, खाणेपिणें, कपडालत्ता वगैरे प्राणधारणेला आवश्यक गोष्टीची व्यवस्था मुनासिपाल कारपोरेशन व सरकार या उभयताकडून होईल असा अंदाज आहे. सरकारच्या मदतीशिवाय नुसत्या कारपोरेशनच्या हातून एवढा खर्च भागवणार नाहीं. शिवाय वरलेहि त्याप्रमाणें महाव्याधीनीं पिडीत मनुष्यास समाजांतून काढून त्याच्यासारख्या समदुखी रोग्यांच्या मंडळीमध्यें खुषीनें किंवा बळजबरीनें नेऊन ठेवण्यासाठीं सरकारातून कायदा मागून घेण्याविषयीं सर्वांचा अभिप्राय आहे व सरकारचें ही मत त्यास अनुकूळ आहे तेव्हां हा कायदा हा सर्वप्रकारें इष्ट आहे.

बरें, वऱ्हाडप्रांतांत वरील प्रकरणांतील किती गोष्टीविषयीं विचार करणें भाग आहे याचा ही प्रस्तुत लेखांत विचार होणें अवश्य आहे. प्रथम, वऱ्हाड सारख्या छोटेखानी प्रांतास महारोग्यासाठीं धर्मशाळा घालतां येईल किंवा नाहीं? या प्रश्नाचें उत्तर फार करून नकार विल्ह्यांत द्यावें लागेल. तेव्हां वरील मुंबईच्या संस्थेंत वऱ्हाड प्रांतानें शरीक होणें हितावह दिसतें. शरीक होणें ह्मणजे वऱ्हाड प्रांतांतील सुखवस्तु लोकांनीं या पुण्य कर्माकडे उदार मनानें दानधर्म करणें होय. होईल तेवढी वर्गणी गोळा करून मुंबईच्या धर्मशाळे प्रीत्यर्थ उभारलेल्या फंडांत सामील केली पाहिजे. ह्मणजे अर्थात वऱ्हाडचे रोगी त्या ठिकाणीं हक्कानें पाठविण्यास सांपडेल. शिवाय दुसरी गोष्ट मुनसिपालिट्यांनी सरकारांतून किती मदत मिळते हें पाहून स्वतांही पदराच्या खजिन्यांतून कांहीं रकम महारोग्या प्रीत्यर्थ खर्ची घातली पाहिजे. तिसऱ्यानें सार्वजनिकसभा, मुनसिपालट्या, व वर्तमानपत्रें वगैरे प्रत्येक सार्वजनिक संस्थेनें वरील विषया संबन्धानें सरकारास व लोकांस जागृत केलें पाहिजे आणि मुंबई कारपोरेशनशीं पत्रव्यवहार चालूं ठेवून योग्य तजविज करण्याकडे सध्यां पासून लागलें पाहिजे. हे वरील विचार वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत धर्मशाळेचो संस्था चालणार नाहीं अशा अनुमानावर बसविले आहेत तरी वऱ्हाडांतच महारोग्याची योग्य व्यवस्था लागत असल्यास ही थोड्या बहुत फेरफारानें वरील गोष्टींचें मनन सर्व प्रकारें होणें अत्यंत आगत्याचें आहे आणि ह्मणूनच आमच्या या सूत्रानें विषयीं लोकामध्य वाद विवाद होऊन आवश्यक गोष्टी संबंधानें निर्णय लागला तर आह्मी वऱ्हाडवाशी गृहस्थांचे फारफार आभारि होऊं.

---

हैद्राबादेस कोळशाच्या खाणी आहेत परंतु निजामांच्या राज्यांतील खाणींचें स्वामित्व विलायतेंतील एका भागीदार मंडळी कडे आहे. या मंडळी मुळें निजामसरकारची कशी बुडवणूक झाली आहे हें दोन वर्षां पूर्वींच्या त्या मंडळीतील लांछनास्पद बखेड्या वरून लक्षांत येईल. या मंडळीच्या प्रत्येक भागाची किंमत महिनाभरा पूर्वी बाजारांत फार उतरली होती आणि त्यामुळें भागीदार मंडळींत चलबिचलही झाली होती. परंतु त्या मंडळीच्या व्यवस्थापकांनीं भावी फायद्याचें आश्वासन दिलें आणि भागाची किंमत उतरली आहे तरी ती क्षणीक असून कोणाचेंही नुकसान होणार नाहीं तेव्हां निरनिराळ्या भागांची बेची करून फसूं नये अशी कागदीं पत्रीं स्पष्टपणें सूचनाही झाली होती. आणि त्यांची ही सूचना कांहीं वावगी नाहीं कारण हल्लीं कोळसा खाणींतून पुष्कळ काढिला जातो आणि कालांतरानें या खाणी साऱ्या हिंदुस्थानांत मुख्य होतील असा सुमार आहे. पण ही घडामोड काय आहे हें समजून तरी आपणांस काय लभ्यांश

---

लार्ड हारीस मुंबईचे गव्हरनर आल्या पासून 'क्रिकेट' नांवाच्या खेळास मोठें उत्तेजन मिळालें आहे. स्वतां लाट साहेब खेळण्यांत पटाईत आहेत आणि खेळण्याचा नाद ही साहेबांस विशेष आहे. तेव्हां हल्लीं पुण्यांस लार्ड साहेबांच्या गोष्टी वर्तमान पत्रांतून ऐकूं येतात त्या मध्यें गव्हरनरांच्या ( Runs) नियमित अंतरावर पळण्याच्या कधीं शंभरावर झाल्या कधीं शून्य झाल्या, कधीं नाच ( बॉल ) बंगल्यावर झाला कधीं लेव्हीच्या ( राजदर्शनाच्या ) रूपानें शिष्ट संभावित मंडळीचा मेळा बंगल्यावर जमविला होता इत्यादि गोष्टी मुख्यत्वें करून वाचण्यांत येतात. खरोखर अशा प्रकारच्या वागणूकी गव्हरनर साहेब लोका मध्यें खेळतांना बोलतांना अधिक लोक प्रिय वाटतील परंतु त्या पासून त्यांच्या कर्तव्याला पुष्कळ गोष्टी आड येण्याची मोठी जबर भिती आहे. गव्हरनरा सारख्या राज पुरुषांचें काम मोठें बिकट आहे आणि ह्मणूनच कविकुलगुरु कालिदास, चांगल्या राजा विषयीं ह्मणतात कीं:-

॥ स्वसुख निरभिलाषः खिद्यसे लोक हेतोः ॥

— गेल्या नारळी पूर्णिमेस पार्लमेंट सभे मध्ये लार्ड क्रास साहेबांच्या बिलाचे दुसरें वाचन होणार होतें. या बिलाचा सभ्यांच्याच बैठकी मध्यें निकाल व्हावा असा असा साहेबांचा मना पासून हेतु आहे मि. ग्लाडस्टन साहेब या वाचनाच्या वेळीं भाषण करणार आहेत. त्या शिवाय मेसर्स म्याकलारेन, इलिस प्रभृति गृहस्थ भाषणें करणार आहेत. लार्ड क्रासच्या बिला संबधानें या मोठ्या गृहस्थांनीं वादविवाद करण्याचें योजिलें आहे हें गेल्या इंग्लडच्या मोहिमेचें फळ होय.

The Berar Samachar

MONDAY, AUGUST 11, 1890.

## THE POST OFFICE LIFE INSURANCE SCHEME.

We have often referred in our columns to many agencies that may be brought into operation to diminish pauperism. Much stress has been laid upon the influence that has already been exerted by national education. Great importance has also been attributed to improvements in land tenure and to the extended applications of the principles of co-operation and copartnership. It is also of great moment that no opportunity should be lost in bringing within the reach of the people every available facility for the promotion of thrift. It is a gratifying fact that there has been of late a marked decline in intemperance among the higher classes of our community. This is the natural consequence of higher education. As illustrative of the spread of saving habits amongst the poor, it may be mentioned that no less than two in a hundred of the entire town population is a depositor in the Post Office Savings Bank. Many new forms of saving will be gradually developed with an increase of providence amongst the poor. It is certain that when the people feel that they have within their reach a perfectly safe means of making provision for the future it will much less frequently happen that beggary and joint family system are the only resource in old age and for those who are left widows and orphans. It is the duty of a vigorous administrator to entertain the best intentions towards his subordinates. With a principle of justice tempered with mercy he must keep a silent eye upon the progress his people are making. What a father is to his children, what a school master is to his pupils is an able administrator to his subordinates, always devising means for their elevation.

The Berar Educational conference is a novel movement and every praise is due to the vigorous and well intentioned venerable originator of it. The other day at that Conference a most if not the most responsible person threw a thousand aspersions upon the morals, integrity and providence of his subordinates. This was all right. Exposure is an unfailing corrective, But we find no steps taken to better their condition. It is a consolation and indeed a great consolation it is that those who felt themselves injured were allowed their own way The speaker by his subsequent conduct identifying himself with common prattlers so numerous in large and cheap towns. It is easy to destroy till it is difficult to construct. These are all observations made with a view to incline officers to stimulate habits of saving among their subordinates. When an officer is promoted if a part of his increased earnings were departmentally allotted to premiums on a compulsory life insurance, the widows and orphans of many who prematurely quit this world will be saved from pauperism. The officers themselves whom we heartily wish long life will take away when invalidated what youth needed not and will thus have not only to depend upon their miserly stipends but upon a large additional fund which may be utilised in further production. A departmentally assured life will assure a further devotion to work. How these things can be effected it is not our province at present to give out. If the persons whose attention we have humbly called to this proposal of ours were seriously to turn their mind to it, further comments will be forth coming.

These remarks were occasioned by a recent valuable publication giving some information about the effective working of the Post Office Life Insurance scheme. Some two years ago it was extended to government servants in the Telegraph Department. This has been attended by a marked increase in the business done. In 1887-88 the number of new policies granted was 123 of the aggregate value of Rs. 156000, while during the past year 228 persons effected insurances amounting to 327500. The total amount realised on account of premium last year was Rs. 40831 and claims paid amounted to Rs 9122 as against Rs 13782 in the previous. The total number of assurances upto the end of the period reviewed upon was 1055, the total amount realised on premiums Rs 148 228, total amount insured Rs 1375625 and total of claims came to Rs 36393.

The majority of the assured nearly 9 per cent were between 26 and 30. The next highest percentages 8.42 and 7.58 being between 31 and 35 and 25 or under respectively. Only 3.76 were between 41 and 45 and 1.37 over 45. The age of discretion therefore appears to be a good deal early. It is true a service has been generally recruited by this age. Yet at such an early dawn of life it is evident people have begun seriously to think of the future. Comparing the present with the past the prospect for the future appears to appal them. Youth is the most sanguine period of life but youth and prime appear the more hideous and furnish more melancholy to the mind in our country.

The monthly allowance scheme does not seem so far to have been any thing like a success. Only two contracts have been in existence at the end of the year. The distribution of new policies was 76 in Lower Bengal and Assam, 23 in Madras and 13 in Bombay. It is to be pitied that people have not yet been inclined to take advantage of the facilities so carefully afforded them for saving.

## No.VI
## INDIA AND ITS MANUFACTURES.

(Continued from our last issue.)

The summum bonum of our religion is that man should care little for this world but should try for getting excellence in the other world. This doctrine, being thoroughly imbibed in the hearts of men, has produced such an evil tendency of dependence. Such is the force of these long cherished sentiments that men even cherish it. Though they are convinced that the Western principle of individual independence is necessary for permanent well being they are not yet prepared to act according to it. When once that principle is received by the mass in general not as a theory but as a sentiment our work is over. The whole aspect of India will be changed. But it will certainly take a century or two From our present state we find that efforts have been made in that direction by our leaders and by governments. The institutions, such as Local self-government English Colleges, Colleges for Technical Instruction &c. have successfully done a great deal towards inculcating the principles of individualism. Thus this may be called a transitional period from old sentiments of dependence to individualism. And it is natural and probable that this transitional period will last long. Then are we to satisfy ourselves by saying that we should wait for the end of this period? Competition is a necessary element for stimulating men's genius for finding out certain manufactures to facilitate the means of their gain. And competition can only have its full play when individualism exists. So are we to say that we should wait for the time when we shall imbibe those principles of personal independence? The obvious answer is yes. Because we have already spoken that competition will not grow in a foreign land of dependence. But if we will consider a little we shall find that we can introduce competition in our country even before that time. It can be proved by historical method that men's tendencies and sentiments about commerce can be changed sooner than their religious tendencies and sentiments. The Protestant England of 17th century tried to put a stop to the social intercourse with a Catholic nation such as France and Spain. Led by their absurdities the English people even bore a kind of hatred towards the commercial institutions of Catholic nations, To follow the trade of a Catholic was considered sin. Usury was held in check and contempt by all Christian nations. But how long their sentiments remained unaltered? Only for a few years though their religious sentiments continued to be so though little lessened. The Mahomedan religion forbade every kind of money dealing but we now find hundreds of them as money dealers. Even we the victims of long cherished sentiments have advanced in point of trade. Dealing in corn and leathern articles such as bags and port mantoes are now found among articles of sale in many shops conducted by the Hindus— Hindus who in the sense of the rules of Vedic scriptures were not allowed to do so. So our apparent affirmative answer to the question whether we should wait for the lapse of this transitional period must be now modified. This transitional period not only with respect to commercial aspect but with respect to the moral and religious aspects also. At the end of this period we have good reason to hope that we will be individually independent in every respect morally, politically, religiously and commercially. But we have proved above, that moral and religious individualism will come after the commercial individualism.

## REPORT ON CRIMINAL JUSTICE IN HYDERABAD DISTRICTS 1889

In Col. Mackenzie, the Beraees have a strong and sympathetic ruler of men at the head of the judicial administration of the Province. He is strong because he spares none of his subordinates high or low and expects them to do hard work as much as he does it himself This is an excellent and necessary virtue in a good administrator. In all branches of administration work, just as in private business efficient work is done only when there is good super vision over subordinate officials.

Col. Mackenzie is sympathetic because he enters into the feelings, sentiments and peculiarities of the Service people and endeavours to look at things from the people's stand point. His remarks (Para 19) on the Pola festival, which may be mentioned by the way as an agricultural festival deserve to be read by all European officials entrusted with the duties of administration justice to the people of India. Our judicial commissioner is also not unmindful of those of his subordinates who have served him well. He recommends to the favourable notice of the Resident the names of the following officers viz popular civil sessions judge Mr. sffard. Mr. Elliot, Mr. Hares ann amongst the clerks messars Jones, mahomed Lshman Ballaji Rajaram.

The observations made by the judicial Commissioner on paras 23, 24, 25, of the Report in our humble opinion require stronger basis to support them than has been offered by the statistical figures in the Report. In respect of minor offences such as assault, if upon the examination of the complaint, there appears to be a sufficient ground to proceed, there is no reason on earth why the magistrates should be held responsible for proceeding with the case and to discharge, convict or acquit according to the result of the enquiry before them. If the truth of complaints made is to be measured by the convictions obtained, and it is to be an Index also of the honesty or dishonesty of the magistracy the trying magistrates would be simply bound over to convict all persons complained against. We do not mean to say that District magistrates should not take care to exercise vigilant control over their subordinates but at the same time it must be borne in mind that persons sitting on the bench rules should not be made to feel that terror of any kind is hanging over them of course Sub Magistrates are bound to obey the orders of their respective appellate courts. If there exists a popular belief that sub-magistracy here is open to the temptation of making illicit gains, and if the head of the department is aware of its existence we humbly think that an inquiry ought to be instituted to investigate the matter and popular mind disabused of its false impressions.

The Judicial Commissioners remarks in regard to the July of District Magistrates to keep the Police of his District efficient are well worthy of perusal by all administrators. The District magistrate and the District Supdt. of Police should not enter in to a family arrangement but should work in a manner that the Police may feel that they have to work under the constant and vigilant supervision of the District Magistrate. We cannot conclude our observations without remarking that the Report on Criminal practices by Col. Mackenzie is full of interest interspersed as it is with inferences based on facts and statistical figures. It will repay the trouble of perusal.

## वऱ्हाड.

हवामान—पाऊस शनिवार रात्रीं पासून एक सारखी झड लागली आहे व आता आठचार दिवस उघडेल तर बरें होईल शेतीची कामें करण्यास वेळ सांपडेल रोगराई नाहीं.

शनिवारीं सर्किट हौस मध्यें युरोपियन लोक नाटक करणार आहेत.

मि. स्पागिल हे एलिचपुरास पो० सु० चे जागीं गेले.

तारीख १८ रोजीं येथें सेशन सुरू होणार.

कालरोजीं स्टेशनावर हमाल लोक कपाशीच्या गाठी वर चढवित असतां गाठ एकाचे पायावर पडून पाय मोडला असें समजतें.

निजाम सरकार आपल्या राजधानींत नवी न टांकसाळ काढणार आहेत आणि त्या साठीं विलायतेहून यंत्रें आणविण्याचें ठरवित आहेत.

## वर्तमानसार

ड्युक आफ कनाट हे विलायतच्या हार्स गार्डच्या पलटणींत एका आफिसरची नोकरी करणार आहेत!

कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या गाफीलपणाबद्दल एक गोष्ट हल्लीं कांहीं पत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. एक विद्यार्थी परीक्षेंत नापास होऊन त्यानें पुनः त्या परीक्षेच्या अभ्यासास सुरवातही केली होती. पुढें तो आपण कोणत्या विषयांत नापास झालों हें पाहण्याकरितां रजिस्टरकडे गेला असतां त्याला रजिस्टरानीं सांगितलें कीं आपलें नांव चुकून छापण्याचें राहिलें. आपण पास आहां.

पडद्याच्या चालीमुळें उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ मयत झालेल्या स्त्रियांचीं हीं पेनशनें अद्याप त्यांच्या घरांत पोंचत आहेत, असें आतां बाहेर आलें आहे.

निजाम सरकार सरदार दिलरजंग अबदुल हक यांजवर अर्ध्या कोटीची फिर्याद मुंबई येथील हायकोर्टांत करणार आहेत. तेथील सर्व बारिस्टर निजाम सरकारानें आपल्याकडे घेतल्यामुळें उलट पक्षाकडून कलकत्ता व मद्रास येथील सर्व बारिस्टरास वकीलपत्रें देण्यांत आलीं आहेत.

निजाम साहेबांचे माजी दिवाण सरसालरजंग यांच्या कर्जाचा तपास करण्याकरित एक कमिशन नेमलें आहे. हें कमिशन दर सोमवारीं, बुधवारीं आणि शनिवारीं बसूनच चवकशी करील. ही चौकशी झाल्यावर खुद्द निजाम साहेबांच्या कर्जाची चौकशी कमिशन नेमून होणार आहे. क० त०

मि. बळवंत रामचंद्र अनगल यास हाय कोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली.

मि. रावजी परशराम पंडित यांस सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत वकिली करण्याची सनद मिळाली.

पुण्यास एका पाचवर्षांच्या मुलास पायमोजे चोरल्याबद्दल ६ फटक्यांची शिक्षा देण्यांत आली.

यंदाच्या सार्वजनिक सभेच्या वेळीं ही कांहीं भांडाभांडी झाली असें ह्मणतात. असें होणें चांगलें नाहीं.

दहा वर्षांच्या आंतील मुलास ७ वर्षांहून जास्त व १० वर्षां नंतरच्या मुलास ९ वर्षांहून जास्त रिफरमेटरी तुरुंगांत जाण्याची शिक्षा देण्यांत येऊं नये असें हायकोर्टानें ठरविलें आहे.

मक्का येथें पटकी उठली आहे.

पुण्याचें शेतकीचें प्रदर्शन ता० ११ सपटंबर रोजीं उघडलें जाईल.

रशियांत राहणाऱ्या ज्यू लोकांस हाकलून देण्याचा त्या प्रांतांत कायदा झाल्यामुळ सुमारें १० लाख ज्यू लोकांस त्या प्रतांतून नुकतेच हाकलून देण्यांत आलें!

आफ्रिकेंत एका पाद्रीस तीन चार बायका केल्याबद्दल पकडण्यांत आलें आहे.

मुंबईंत पोहोण्याची जी एक मंडळी आहे. त्या मंडळीचे मुंबईचे गव्हरनर पेट्रन झाले. विशेष आश्चर्य नाहीं.

मुंबईच्या आर्ट सोसायटीचें भावनगरचे ठाकूर हे लाईफ मेंबर झाले.

१८४९ सालीं आस्त्रियांत एक लढाई झाली त्यावेळीं मेलेले सुमारें ३०० लोक जवळच्या एका मिठाच्या खाणींत फेकून देण्यांत आले होते. यंदा या खाणींत अतीशय पाऊस पडल्यामुळें ते मुर्दे वर आले असून ते जसेच्या तसेंच कायम आहेत. त्यांच्या आंगावरील जखमाही स्पष्ट दिसत आहेत. मिठांत मुर्दे असल्यामुळें हा असा प्रकार झाला असावा.

नागपूरच्या कमिशनरच्या विरुद्ध एका गोऱ्यानें दोन घोड्यांचे भाडें ह्मणून ७९८ रुपयांची स्मालकाज कोर्टांत फिर्याद लाविली आहे.

रायगड— संबलपूर रल्वेतून उतारू येऊं जाऊं लागले.

आफ्रिकेंत पुन्हा दंगा सुरू झाला असें झांझिबारचो ता. १ मिनहूची तार सांगते.

इंडिया व आस्ट्रेलिया यांतील पोष्टांचा दर लवकरच कमी करण्यांत येणार आहे.

पुण्यास पटकी उठली आहे व यामुळें छावणींतील कोणीही शिपायानें शहरांत जाऊं नये असा हुकूम सुटला आहे.

कांहीं दिवसांनीं आम्हा नेटिवास सरकारी नोकऱ्या मिळतील किंवा नाहीं याचीच शंका वाटूं लागली आहे. ब्रह्मदेशाकडे कित्येक युरोपियन पोरी व मडमा पोष्टांत चाकरी करूं लागल्या आहेत असें बाहेर आलें आहे! मिस आन्योने नावाची एक पोरगी रंगूनच्या पोष्टांत कारकून आहे, मिस फ्लैडन नावाची रंगून येथें सबपोस्ट मास्तर आहे, मिस मनरो हीही सब पोष्ट मास्तरच आहे. या शिवाय ही कित्येक जागा बायकांनीं पटकावल्या आहेत पण त्यांचीं नांवें कळलीं नाहींत. ज्या खात्यांत नेटीवच नेमले पाहिजेत, युरोपियन नेमतां कामा नये असें स्टेट सेक्रेटरी स्वतः ठराव करतात त्याच पोष्टाच्या खात्यांत असले प्रकार होणें इंग्रजी राज्यास हितावह नाहींत ज्यांचे तेच ठराव मोडूं लागले तर इतर मोडतील यांत नवल काय? ते असो पण आतां आमच्या सुधारकांची वाट काय होणार? ते आपल्या लेकी व सूना शिकवून जो तयार करीत आहेत तो इकडे त्यांच्याच जागा युरोपियन बायका पटकावूं लागतील या हिंदुस्थानांत कांहीं दिवसांनीं हें युरोपियन तत्व जळो, काष्टो, पाताळीं न होवो ह्मणजे मिळविली. काय आमच्या देशाची ही स्थिती!

---

नोटीस

रा० रा० ललुसिंग उर्फ फत्तेसिंग वल्लद धनसिंग जमादार रजपूत राहणार प्रगणें पातूर सेखबाबू ता० बाळापूर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास मी तविगाहाण खत किंमत १०० चे लिहून दिलें आहे. त्याचा करार होऊन गेला सबब तुह्मी मजला सक्त तगादा रुपयाचा केला तुमचा रुपयाचा हिशोब मारुतीचे मढींत केला तेव्हां तुमचे देणें मजकडेस ८५ रु. निघाले. त्याप्रमाणें तुह्मी कबूल केल्यावरून मी दुसरे सावकाराचे रुपये काढून तुमचे घरी रुपये घेऊन आलो असतांना तुह्मी रुपये घेत नाहीं असें ह्मटलें तेव्हां ते रुपये पंच्याशी तुकाराम धनाजी आमले याजजवळ धरवर ठेविले आहे. तर ज्यावेळेस तुमचा पंच्याशी रुपयाचा घेण्याचा हिशोब झाला त्यावेळेस तुकाराम धनाजी आमले, व गोविंदा उगले व नथुभाई मुसलमान नारहरी ढवळे हे चार इसमाचे समक्ष ची गोष्ट आहे. त्याप्रमाणें तुमचे रुपये सदरील इसमाचे जवळ धरवर ठेविले आहे. करितां ही नोटीस पावले तारखे पासून आठ दिवसांचे आंत तुमचे रुपये घेऊन जावे आणि माझा तविगाहाणखताचा दस्तायवज आणून द्यावा या नोटिशीप्रमाणें न केल्यास ताब्यांत दिलेला माल मी आपले ताब्यांत घेईन. तुमचे रुपयाबद्दल जरकरितां पुढें तुह्मी फिर्याद वगैरे कराल तर त्याचा खर्च आम्ही देणार नाहीं. कारण रुपये देण्यास आम्ही तयार आहों व्याज नोटीस पावलेपासून बंद समजावें कळावे ता० ४-८-९० इ०

(सही)

१ लक्ष्मीबाई मर्द रतनाजी पाटील इंगळे राहणार पातुर शेखबाबु जि० खुद्द बांगडी

---

## अकोले बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००।– |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००= |
| सुवर्ण.... | २०। | रुपें | १०९ |
| आळशी खंडीस ८२ | | उडीद | ६० |
| गहू काटे ६१। | | बाशी | ६५ |
| जवारी नवी ४३ | | चणे | ६२॥ |
| रुई | सर्की ३॥। | मोठ | ४। |
| | तूप ९।= | तेल | ४॥। |

सव्याचे भाव.

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत संवत | १९४७ | ४४।= |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ५९= |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ८०≡ |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५८। |
| सर्की वै. नव सालाची | १९४७ | ३॥।– |

---


## जाहिरात.

विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

किंमतीशिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

स्त्री शिक्षण व इतिहास वगैरे पुस्तकांस मोठमोठ्या विद्वानांनीं उत्तम असे आपले पुष्कळ अभिप्राय दिलेले आहेत त्या पैकीं खालचा हा एक आहे.

Mr. G. M. Sathe, Registar of native publications in his report to Govt. for the year 1888 says:— "Among the Historical works of the year, History of the native states, chapter I, by Mr. Limaye, gives much useful information."

### १ सौभाग्य मंदीर.

[भाग पहिला.] किंमत ०१२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषय.

१ स्त्रियांची योग्यता, २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म, ३ स्त्रियांचें भूषण, ४ स्त्रियांचे दूषण ५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी, ६ स्त्रियां वरील कांहीं विशेष प्रसंग, (पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी) ७ शांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रांस उपदेश, १३ शकुंतलेचें राज सभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मी गर्व परिहार, १६ रुक्मिणीची पत्रिका, १७ सिता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनाचा मोठेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा मनोरंजक संवाद २४ स्त्रियांचें परावलंबन

२ स्त्री शिक्षण ज्ञानमाला.... .... ....०१२

या पुस्तकांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रियांस वाचण्यास योग्य असे पुष्कळ विषय निबंधरूपानें दिले आहेत.

३ संसार दर्पण.... .... ....०१०

याही पुस्तकांत स्त्रियांच्या संबंधानें बोधपर असे पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय आहेत

४ मुलींची सासरीं वागणूक.... .... ....०६

५ सासुरवास चंद्रिका. (पूर्वभाग) ०७

६ सदरचा (उत्तर भाग.) .... ....०५

इतिहास विषयक पुस्तकें.

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास........०६

२ श्री सेतुबंध रामेश्वर वर्णन........०२

नेटिव राजांचा इतिहास

(भाग पहिला.) किं. ०१४ आणे.

खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१ बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर ४ किसनगड, ५ बुंदी, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोटा, ९ टोंक, १० करवली, ११ शिरोही, १२ जेसलमिर, १३ रेवा १४ उर्वी किंवा तेहरी, १५ दतिया, १६ सावन्तूर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास २१ जावरा.

नेटिव राजांचा इतिहास.

(भाग दुसरा) किंमत १२ आणे.

यांत ६ संस्थानांचा इतिहास आहे.

१ उदेपूर. २ जयपूर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर, ६ जव्हार.

मनोरंजक विषयांचीं पुस्तकें.

१ संगीत गोपीचंद नाटक.... .... ... ०९

२ गारुडी लोकांचा खेळ.... .... .... ०६

३ स्त्रियांची मंगल कार्यें अथवा डोहाळे जेवण आणि हळदी कुंकूं. .... .... ....०६

४ स्त्रियांचें नेत्र कटाक्ष.... .... ....०३

५ न्हाणवळी आणि ऋतुशांती.... .... ०५

६ स्वतंत्र विधवा व त्यांच्या तरुण मुली०५

७ तरुण बायको अथवा स्त्रियांची स्वतंत्रता .... .... ........०५

८ तरुण स्त्रियांची मौज ..............०५

९ सावित्री आणि पुरुषोत्तम अथवा अनाचाराचा परिणाम ........०५

१० बकावली........................१०४

शाळांतील लहान मुलांस उपयोगी पडणारीं पुस्तकें.

१ अंकगणितसार (भाग पहिला.) ०३

२ तोंडचे हिशेब (भाग दुसरा.) ०१०२

३ हिंदुस्थानचा भूगोल..............०१

४ महाराष्ट्र देशाचा इतिहास..........०१

५ सदरची जंत्री ........................०१

६ अंकलिपी. (सचित्र.)............०१०६

या शिवाय आह्माकडे आणखी दुसऱ्या तऱ्हेचीं पुस्तकें मिळतील व्यापारी लोकांस चांगलें कमिशन देऊं

हीं सर्व पुस्तकें उमरावती येथें "प्रमोदसिंधु" छापखान्यांत व खालीं सही करणार यांचे कडे रोख किंमतीनें अगर व्हाल्यूपेबलनें मागविलीं असतां पाठविलीं जातील.

वि० जो० लिमये.

पत्ता:— कांदेवाडी मुंबई गिरगांव पोष्ट.


---

हें पत्र अकोला येथें कै० व[illegible]चे खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ३ " ३ "
मालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु०१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस .......०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............8 " 8 as
Single copy....................................4as

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY AUGUST 18 1890 NO 32

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १८ माहे आगष्ट सन १८९० इ० अंक ३२

डा. वामन गोपाळ यांचा अनेक औषधिमिश्रित

### सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व सांधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, असें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

### गोळ्या.

यापसून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता लाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

### कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. याने सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकारितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गीतमराव केशव, मुंबई.

वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज
बक्षिस रुपये ९०

प्रसिद्ध सर जॉर्ज वॉशिंगटन याचें चरित्र मराठींत लिहून आणून ज्याचें सर्वांत उत्तम ठरेल त्यास 'वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज' कडून रुपये ९० चे बक्षिस मिळेल. ग्रंथ लिहिणारा सदर्हू समाजाचा मेंबर * असला पाहिजे. चरित्र लिहिणें तें एखाद्या विवक्षित इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर नसावें. देववेल तितक्या जास्त इंग्रजी ग्रंथांतून माहिती देऊन सदर्हू पुरुषाचें साद्यंत चरित्र द्यावें. त्यांत विशेषकरून त्याची एकनिष्ट देशभक्ती आणि सत्य प्रीयता, व अमेरिकेंत स्वतंत्रतेची स्थापना करण्या करितां त्यानें केलेले प्रयत्न याचें पूर्ण विवरण असावें. व ग्रंथ करवेल तितका मनोरंजक करावा. डेमी द्वादशपत्री साच्याची ( थोरले बाजीराव चरित्र अथवा तारा नाटक या पुस्तकाचा साचा ) निदान सुमारें ७९ पृष्ठें व्हावीं.

ग्रंथ तारीख १ फेब्रुवारी सन १८९० च्या आंत रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर हेडमास्तर हायस्कूल उमरावती यांजकडे पाठवावा. त्यावर आपलें नांव न घालतां एखादें वाक्य अथवा पद्य घालून निराळ्या पाकिटांत अमुक वाक्य अथवा पद्य ज्यावर लिहिले आहे त्या पुस्तकाचा कर्ता अमूक आहे अशा विषयीं चिठ्ठी लिहून घालावी. अमूक ग्रंथास बक्षिस द्यावयाचे असें ठरल्या नंतर हीं निराळीं पाकीटें उघडण्यांत येतील. हीं पाकिटें मोहरबंद पाठवावीं. अकोलें १३।७।९०

गोविंद विश्वनाथ देशपांडे
व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर
सेक्रेटरी, वऱ्हाड हायस्कूल विद्यार्थी समाज

* अकोलें व उमरावती हायस्कूलांचें सर्व माजी विद्यार्थी या समाजाचे मेंबर होत.

### वेरूळ येथील लेणी.

( २४व्या अंकावरून पुढें चालूं )

अवरंगाबादेस एक पाणचक्की आहे ती अवरंगजेब बादशाहाच्या वेळीं एका फकिरानें बादशाहाच्या मदतीनें बांधली. या ठिकाणीं पाण्याचा जो हौद व कारंजे आहे त्यांत मोठ मोठाले मासे आहेत तें हौद बांधला तेव्हां पासून त्या ठिकाणीं आहेत. तेथें मासे मारण्याची मनाई आहे. पाणी वऱ्याच उंचावर चढवून नेलें आहे. या उंच जागेवरून लांकडाची जी चक्की आहे तिजवर पाण्याचा धबधबा पडतो. त्या मुळे तें चाक हालूं लागतें म्हणजे ज्या खांबाला हें चाक जोडिलें आहे तो खांब हालतो. खांबाच्या वरच्या टोकास दळण्याचे जाते आहे त्याच्या तळ्या आपोआप फिरूं लागतात पाणचक्की जर सर्व दिवसभर चालविली तर सुमारें ४॥ मण गहुं दळला जातो. यापाण चक्कीच्या कारखान्याच्या संबंधानें दोन मोठ मोठाल्या मशिदा आहेत या मशिदींत बसण्या करितां विस्तीर्ण अशा सतरंज्या आहेत.

अवरंगाबाद येथें इंग्रजांची छावणी आहे त्या छावणीतील पलटण सर्व एतद्देशीय लोकांची आहे वरिष्ट कामगार मात्र इंग्रज आहेत. ही पलटण हैद्राबाद कानटिंजंट या नांवानें प्रसिद्ध आहे. अवरंगाबादे सारख्या छावण्या निजाम सरकारच्या मुलखांत ६ आहेत त्यांचीं ठिकाणें अवरंगाबाद, जालणें, सिकंदराबाद, हिंगोली, एलिचपुर. आणि रायपूर. हैद्राबाद कांटिंजंट या नांवाच्या सैन्याचा खर्च चालण्या साठींच आपला वऱ्हाड प्रांत इंग्रजाकडे तारे गहाणा सारखा आहे. या प्रांताचें सर्व उत्पन्न या सैन्याकडे लाविलें जातें. अवरंगाबाद हें दक्षिणेंत शिरण्याचें नाकें आहे म्हणून इंग्रजाची छावणी येथें आहे. या छावणींत रतन शेट नांवाचा लक्षाधीश सावकार होता. तो कांहीं वर्षांपूर्वी मरण पावला. त्यानें बुलिवर्ड गार्डन या नांवाचें फारच रम्य स्थळ बांधिलें आहे. हे नदी किनाऱ्यावर आहे. नाशिकास जसें घाट बांधिले आहेत तशाच प्रकारें या रतनशेटजींनीं बगिच्या बांधला आहे. घाट न बांधितां नदी किनाऱ्यावर जर बगिच्या बांधण्याची चाल चोहोंकडे सुरू झाली तर ज्या ज्या गांवीं नदी असेल त्या त्या गांवीं फिरण्याची व सुखलाभ घेण्याची बहुतच रम्य स्थळें उत्पन्न होतील. आणि नदी किनारा ज्या घाणीनें भरलेला असतो ती घाण नाहींशी होऊन तो किनारा रम्य होईल. हा बगिच्या फार मोठा नसतो. साधारण रुंदसा रस्ता करून त्याच्या दुतर्फा झाडांची रेलचेल करून सोडणें यालाच बुलिवर्ड गार्डन असें ह्मणतात. अवरंगाबाद येथेंच ही चमत्कृती माझ्या पाहण्यांत आली.

शत्रुपासून बचाव होण्या सारखा अवरंगाबादेचा तट नाहीं; इंग्रजांचे शिपाई व शिबंदी पाहिलें असतां शहरांतील शिपाई भिकार असा भास होतो. इंग्रजांनीं तयार केलेल्या काळ्या शिपायाची बरोबरी एतद्देशीय राजवाड्यांनीं तयार केलेले शिपाई करूं शकणार नाहींत. छावणीच्या वस्तीवरून पुष्कळ गोष्टी निजाम सरकारच्या अधिकाऱ्यांनीं अनुकरण करण्यासारख्या आहेत. तें अनुकरण करतील तर फार बरें होईल.

या शहरीं गुजराथी शाळा १९० वर्षांपासून चालत आलेली आहे शिकविणारा पंतोजी पिढीजाद काम करीत आहे. येथें गुजराथी लोकांची वस्ती फार असून पुरातन अशी आहे सरकारांतून शाळेला मदत महिना वीस रुपये मिळते.

छावणींत चर्चमिशनरी सोसायटी या नांवाच्या ख्रिस्ती मंडळानें आपलें ठाणें केलें आहे. रेवा. मि. रतनजी नौरोजी हे ग्रहस्थ मिशनाचें सर्व काम पाहतात. आसपासच्या खेड्यांतू माहार मांग वगैरे लोक ख्रिस्ती झाले आहेत. यांचें सर्व यश मि. रतनजी यास आहे. एतद्देशीय लोकांस उत्तम प्रकारें कामचालवितां येतें याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. ( पुढें चालूं )

वऱ्हाडसमाचार

मिती अधीक शुद्ध २ शके १८१२

### शंकराचार्यांच्या वेळेच्या गोष्टी.

नामदार काशीनाथ त्रिंबक तेलंग यांनीं 'रायल एशियाटिक सोसायटी' या नांवाचे मंडळीचे सभेचे वेळीं ता. १४ जुलई रोजीं शांकरभाष्या संबंधानें व त्यावेळचे कांहीं गोष्टी संबंधानें आपले विचार सांगितले. शांकरभाष्या सारख्या तत्व ज्ञानानें ओतप्रोत भरलेल्या पुस्तकांत त्या वेळचे वस्तु स्थिती संबंधानें फारशा गोष्टी आढळण्याचा संभव नाहीं. तरी राजकीय सामाजिक इत्यादि कांहीं जुन्या गोष्टी समजतात त्या येणें प्रमाणें:—१ ला मुद्दा त्या वेळच्या राजकीय स्थिती संबंधानें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं त्यावेळीं सार्वभौम राजा नव्हता. एका शंकेचे उत्तर देतांना भाष्यांत असें लिहिलें आहे कीं " आतां ईश्वराशीं लोकांचें भाषण होत नाहीं ह्मणून पूर्वी होत नव्हतें असें कोणी ह्मणूनये कारण आतां सार्वभौम राज्य नाहीं ह्मणून पूर्वी नव्हता असें त्यास कबूल करावें लागेल. " या वरून हें स्पष्ट आहे कीं शंकराचार्यांचे वेळीं कोणी सार्वभौम राजा नव्हता व हें सर्वांना माहित होतें. हिंदुस्थानांत अशीच स्थिती असावी असें इतर दुसरी जीं कांहीं पूर्वीचा इतिहास मिळविण्याची साधनें आहेत त्या वरून कळतें. 'अलेक् झांडर' चे वेळीं पुष्कळ वेगवेगळे राजे होते 'हुयेनत्सयांग' प्रख्यात चिनी प्रवासी यानेंही असेंच लिहून ठेविलें आहे 'मासुदी' वगैरे आरब इतिहासकार असेंच लिहितात व महमद 'गिझनी' व 'अल्लाउद्दिन खिलजी' यांचेवेळीं ही अशीच पुष्कळ स्वतंत्र राज्यें होतीं हें आपणांस इतिहासातून माहित आहेच एका वेळीं पुष्कळ महाराजे असून शकतील पण 'महाराजाधिराज' ही पदवी एकावेळीं फक्त एकासच असेल असें फर्ग्युसन साहेबाचें मत आहे. हें खरें असो किंवा खोटें असो 'महाराजाधिराज' हा सार्वभौम दुसऱ्या महाराजाधिराज होता

ता हर्षवर्धन हाही स्वतंत्र राजा होता.—दुसरा मुद्दा. भाष्यांत आत्मां इहलोक सोडून कसा कसा जातो हें सांगतांना लिहिलें आहे कीं "आपण पाहतो कीं राजे सुद्धां प्रवाशांनां कठीण मार्ग दाखविण्यासाठीं हुशार लोक नेमतात" आणखी पुढें लिहिलें आहे कीं जगांत सुद्धां प्रवाशांना बलवर्भा राजा पासून जयसिंहाकडे व त्या कडून पुढें रिष्णुगुप्ताकडे जाण्याचा सांगण्याची चाल आहे" या वरून असें दिसतें कीं राजे हे प्रवाशांना मदत करित असत व अशा रीतीनें प्रवास करण्याची चाल होती. चिनी प्रवाशी 'फाहि आन' हा असेंच लिहितो. फरक इतकाच कीं 'फाही आन' यानें प्रवाशांनां राजास कांहीं भेट द्यावी लागत असें असें लिहिलें आहे. फरक फार थोडा आहे वर जुळलेल्या सर्व गोष्टीचा विचार केलातर 'फाहिआन' यानें बरोबर लिहिलें असावें असें दिसून येईल तिसरा मुद्दा—भाष्यांत तेव्हांचे धर्मसंबध व चालरीती असाव्या तशा नाहींत असें दाखविलें आहे. 'ह्यिुनेत्स्यांग' यानेंतर हिंदुलोकांचे आपआपले धर्म पाळण्याचे संबंधानें स्तुति केली आहे असा फरक पडण्याचे कारण इतकेंच कीं (कारण दोघेही साधारण एकाच वेळचे होते) शंकराचार्यांनां हिंदुलोक किती चुकत आहेत हें दिसत होतें व त्यामुळें त्यांना वाईट वाटलें असावें. ह्यिुनेत्स्यांग याचा हिंदुधर्मावर भरंवसा नसल्या मुळें त्यांला ते आपले जाति संबंधानें वगैरे कडक धर्म पाळीत आहेत ह्मणून आश्चर्य वाटलें असेल. उदाहरणार्थ सध्यां शास्त्री व ख्रिश्चन लोक हिंदु धर्मासंबंधानें काय ह्मणत आहेत याचा विचार केला ह्मणजे समजेल. चवथामुद्दा—भाष्यांत मूर्ति पूजेचे संबंधानें पुष्कळच ठिकाणीं लिहिलें आहे शंकराचार्यांचें मत आतांच्या मताहून अगदीं निराळें आहे त्यांनीं मूर्तिपूजा ही फक्त इश्वरधानेंची ओनामा आहे असें ह्मटलं आहे पण शालीग्राम किंवा दुसऱ्यामूर्ति कांहीं खऱ्यादेवता आहेत, हेंच ईश्वर व यांचे पूजे पासूनच आपणास मुक्ति मिळेल असें सांगितलें नाहीं. मूर्तींची पुजा करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण त्या वेळीं आपण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं मूर्ति ह्याच खरे देव नव्हत व देवाची कल्पना येत नाहीं ह्मणून (अक्षेर जशी मनांतील उद्गार समजाविण्याची चिन्हे आहेत) मूर्ति ह्या देवाची कल्पना येण्यासाठीं आहेत भाष्यांत शालीग्राम मूर्तीचा बहुतेक सर्व ठिकाणीं उल्लेख केलेला आढळतो आतां भाष्यांत त्या ज्या ठिकाणीं ह्मणून मूर्ति संबंधानें लिहिलें आहे त्यांत शंकरा संबंधानें कांहीं लिहिलेलें नाहीं. मि. एमबार्थ साहेबांचे मता प्रमाणें शंकराचार्य हे वैष्णव होते इतकेंच नाहीं तर विष्णूचा अवतार होते. या वरून शंकराचार्य वैष्णव होते हें जर खोटें नसेल तर आज आमच्यांत ते, शिवाचा अवतार होते ह्मणून जें कांहीं चालत आलें आहे त्याचा दुसऱ्या कोणच्या तरी गोष्टीशीं संबंध असला पाहिजे; व हा समज दोन गोष्टी वरून झाला असावा एकतर पुराणांतील गोष्टी व दुसरें शंकराचार्यांच्या मताला मिळून नसणारें लोक मानुज , माधव वल्लभाचारी वैष्णव होते ह्मणून. पांचवा मुद्दा—प्रो. टानीं साहेबांचें मत असें आहे कीं भवभूतीच्या वेळेच्या पुढें लोंइला पूज्य मानित असावेत भाष्यांत गाई पासून मिळणारे पदार्थ धर्म दृष्ट्या परपूज्य आहेत असें सांपडतें. कवि भवभुति सातव्या शतकाचे शेवटीं शेवटीं असवा. शंकराचार्य हे जर भाशे ह्मणण्याप्रमाणें भवभूतीचे पूर्वीचे असतील तर आपणास भवभूतीचे बरेंच पूर्वी गाई पूज्य मानल्या जात होत्या असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. सहावा मुद्दा—मि. गो यांचें मत असें आहे कीं वेदान्त सूत्रें झाल्यापासून तर शंकराचार्यांचे वेळेपर्यंत खरे अद्वैतमत गुरू परंपरेनें शिकविलें जात होतें. डा. थिबाट यांना मि. गो यांचें मत सम्मत नाहीं. भाष्यांत एका सुत्राला कांहीं व्याख्याकार हा 'पूर्वपक्ष' [संशय] आहे असें ह्मणतात व शंकरा चार्यांचे मतानें तो 'सिद्धांत' (संशयाचीं उत्तरें देऊन सिद्ध केलेली गोष्ट) आहे व दुसरे एके ठिकाणीं शंकराचार्यांनीं आपल्याच मताचे लोक जिवात्म्याचे संबंधानें वेगळे मताचे आहेत असें लिहिलें आहे या दोन सुत्रावरून डा. थिबाट यांचे मत असें आहे कीं 'शंकराचार्यांनीं स्विकारलेल्या 'अद्वैतमता' मध्यें त्यांचे यव्यतिरिक्त दुसरी कांहीं मतें होतीं. मि. गो. यांनीं अद्वैतमताचे ऐकवाक्यते बद्दल जें कांहीं लिहिलें आहे त्याला डा. थिबाट यांनीं दिलेली माहिती थोडीशी बाधक आहे खरी तरी अद्वैतमत गुरुपरंपरेनें शिकविले जात होते याला डा. थिबाट यांची माहिती फारशी बाधकच आहे असें ह्मणतां येत नाहीं. आणखी मि. गो यांचें मत आपल्यांत शंकराचार्य व वेदांत सूत्र कार्यास यांचा संबंध जुळवून देणाऱ्या कवितेला अगदीं तंतोतंत लागू पडतें. भाष्यांत कमीत कमी निदान १४ ठिकाणीं शंकराचार्यांनीं सुत्राचे निरनिराळ्या तऱ्हेचे अर्थ किंवा सुत्राची निरनिराळ्या तऱ्हेची मोडणी दिली आहे. व कांहीं ठिकाणीं सूत्राचे शद्बच निराळे (कांहीं लोकांचे मतानें हे व कांहींचे मतानें दुसरे) दिले आहेत. यावरून इतके सिद्ध होतें कीं शंकराचार्यानां अमुक सुत्राचा अर्थ व्यास मतानें अमकाच आहे असा खात्रीलायक पुरावा नव्हता व ह्मणूनच त्यांना खरा अर्थ शोधण्यासाठीं आपली बुद्धी खर्च करावी लागली असेल. कारण असें जर नसतें तर भाष्यांत निरनिराळे अर्थ देण्यापेक्षां अमकाच अर्थ खरा असें लिहिलेले असते. व यावरून सिद्ध होतें कीं जर शंकराचार्यांना सूत्राचे अर्थासंबंधानें गुरूपरंपरेनें कांहीं माहिती मिळाली असेल तर ती खरीच आहे व मूक सूत्रकारांचा अर्थ अमुकच आहे अशी शंकराचार्यांची खात्री नसावी व त्यांची तशी खात्री नसेल तर आपणास आतां तसें मुळींच मानतां येत नाहीं. सातवा मुद्दा— प्रो. वेबर व प्रो. भांडारकर व प्रो. किल्हार्न यांचा 'आचार्य' शद्बाचे अर्थी संबंधानें जो वाद चालला आहे त्याला भाष्यांतील माहितीचा बराच उपयोग होईल. 'आचार्य' हा शद्ब भाष्यांत जेथें जेथें येतो तेथें तेथें त्यांचा अर्थ 'सूत्रकार' असा आढळतो. व यावरून प्रो. भांडारकर व प्रो. किल्हार्न हे ह्मणतात त्याप्रमाणें पतंजलीचे महा भाष्यांत आचार्य याचा अर्थ 'पतंजली' असा नसावा या ह्मणण्याला बरीच बळकटी येते.

यावर नामदार जव्हेरीलाल उमियाशंकर याजानिक याना शंकराचार्यांसारख्या धर्मोन्नति करणाऱ्या संबंधानें आपणास किती थोडी माहि-

(पुरवणी पहा:—)

The Berar Samachar

MONDAY, AUGUST 18, 1890.

## PROTEST OF THE EUROPEAN DEFENCE ASSOCIATION AGAINST THE INCOME-TAX.

A memorial has been sent by the European and Anglo-Indian Defence Association of Calcutta to the Viceroy protesting against the existence of the Income tax. They quote evidence from the speeches of the members of Council and the Governor General to prove that the Income tax when introduced was necessary under the circumstances as then existing and the public had therefore no option at the time but to strengtnen the hands of Government by loyally submitting to the tax as a measure of pure necessity. They argue, that as that necessity no longer exists, the tax might be abolished. The second argument against the continuance of tha Income tax is that it has been proved to be very unpopular since its introduction, and in official documents published from time to time government officers have not been slow to declare the unpopularity of the tax. The unpopularity of the tax is owing to causes which can be classified under three heads; firstly the tax is unpopular because it is a tax levied directly and people have always a strong dislike for direct taxation in any shape; secondly because it requires an unnecessary praying into other people's affairs and in a way compels them to disclose their private circumstances which they would not be ordinarily inclined to do; thirdly because it gives scope to *native* subordinates to annoy people and levy a kind of blackmail on them. The third argument for its abolition used by the Association is that the costs of collecting it are quite out of proportion to the amount collected and that it gives an amount of extra trouble to the Collectors of revenue and official opinion is quoted in support of this argument as well.

Some of these are well known arguments that are always cited against Income tax and some are the results of actual experience as expressed in official documents. There is one reason however which we might as well bring forward as possibly having influenced the Defence Association to protest against the Income tax. The tax in its extended operation since 1886 falls on official salaries and interest on securities. This has caused a pressure to be felt by the official classes and to this might be referred the strong expression of opinion by government officials as to the tax being *felt* to be very unpopular.

It is only just that every citizen and every member of a society should contibute towards the expenses of conducting the government of that society. In India the land tax falls on the agricultural population which forms really a very large proportion of the total population of India. The merchants and traders, lawyers and doctors and persons following the learned professions generally, and the official classes cannot be said to pay their just proportion of the State expenses, unless they are made to contribute in the shape of a *direct* Income tax. Direct taxation besides has a very good moralizing effect on the people in this way that direct taxation always makes those that pay, alive to the necessity of keeping a vigilant eye on how that money is used by the State. There is a way of lessening the demoralizing influences which are now at work in the shape of pettifogging zulum of native low paid subordinate officials by removing from the operation of the tax incomes to a larger extent that at present; that is to say by increasing the minimum limit of taxable income. By excluding for instance incomes up to 1000 instead of 500 from the operation of the tax, poor people who are least able to oppose the petty zoolum will be free and the mischievous character of the tax will be compromised. But these and such others are not the remedies that the Defence Association is likely to suggest.

With these remarks we will leave the memorial to be judged by the public. It is a well reasoned document and might be studied with advantage.

## THE MAHARAJA OF KASHMIR.

In a recent issue of the Bombay Gazette an attempt is made to justify the action of the Government of India in connection with Kashmir Affairs. It is now freely admitted that the Maharaja was deposed and the plea of resignation on his part is not set forth. In answer to this justification we have only this much to say that there is justification for every thing whether good or evil. Child murders in times of famine, murders on the high season on account of long starvation, corruption on the part of trusted servants of Govt. on account of their living beyond their means are all justifiable acts from the stand point of offenders. To hurry on matters in a court of law and to shut up the party asking relief on the ground of taking time of the court is justifiable from the stand point of military judges. The question is not whether a thing is relatively excusable, but whether the action taken is by itself justifiable. If we look at the Kashmir affairs from this point of view we shall see that the action of the Govt. of India is entirely unpardonable; and the Govt. has rightly deserved the condemnation which it incurred from upright and high minded individuals.

In order to guard the interests of the frontier Provinces, complete subjugation of Kashmir was necessary and since this could not be effected recourse was taken to the shameful step of falsely charging the Maharaja with treasonable correspondence and deposing him by foul means.

To say that this was done for the good of the country and that the Native Press is misled in attributing wrong motives to the Govt. of India for the Govt. of India is made up of English gentlemen is a declaration not founded on facts and figures. There are thousands of English people who have committed grossest of sins. Clive and Warren Hastings, Crawford and though unbroken line of officials in the British service posted either at the Courts of the Native States or in the British territory have all been English men and who have left this country with the course of the thousands of poor people whose property they robbed and whose rights they ignored.

The Americans are decendants of the British race and the blackmen suffer most at their hands. The Australians are British and they have ostracized the meek and industrious Chinamen and Bhorees from India.

The simple fact is that the British people are powerful in India and any resistance made to their progress is met with annihilation. The Kashmir State was a little bit independent and was not in so great a submission to the all powerful will of the British as most of the Indian States are and the result was that the Maharaja was deposed.

If the British influence is completely established as it has been in Hyderabad, Indore, Baroda, Gwalior and several other states annexation in its technical sense is not necessary. If results of annexation are obtained without the nominal annexation the British statesmen are not so unwise as to resort to it unnecessarily. Time has not yet arrived when annexation policy can be easily carried on. But in the course of about 50 or 100 years Native India will be a nonentity. We can assure our country men that the Govt. of India does not wish at present to annex the Kashmir territory to the British possessions but it is anxious to secure the security of the frontiers through Kashmir. The Maharaja came in the way of effecting this reform and it was a matter of their necessity that the Govt. of India was obliged to depose

him.

So that to sum up, the action of the Govt. of India in respect of the deposition of the Maharaja of Kashmir when looked at by itself is unjustifiable in the extreme but it is relatively pardonable from the view of obtaining greater security from the attacks of the Rusian invasion in that quarter.

## THE GOVERNMENT INDIA COUNCIL BILL IN PARLIAMENT.

It is a matter of sincere gratification to learn that the Government have thought it prudent to withdraw the India Council Bill. They have done this no doubt with great reluctance but that they have done it is no small matter of thankfulness to the ministry of Lord Salisbory. There are many here both amongst Europeans and Indians who feel that a necessary measure has been dropped but still we must be permitted to say that on the whole it is better to have no measure at all for some time than have a half one which disatisfied every body except perhaps its mover & its supporters The educated public opinion in India will be content with nothing excepf the introduction of elective element in the Indian Councils howsoever hard may be the qualifications and conditions with which the elective element may be accompanied. The generous public of England took part of the Indian Public and advocated in a measure the cause of the Indian Nation. We are grateful to them for the same. We hope and trust that the present ministry of England will soon find its way to introduce a measure adequate to the wishes and aspirations of the Indian Nation or at any rate it will help in the discussion of Mr. Bradlugh's Bill now before the Parliament. If the ministry sees its way to lend the measure their moral support to it. The Indian Nation will not be the less grateful to it.

Mr. Vaidya... Though late in the day, still not least in the sincerity of our wishes. We offer our hearty congratulations to Mr. Lakshuman Ramchandra Vaidya M A. L L B. for the success he recently achieved in passing a very hard examination necessary to qualify oneself to be enrolled as an advocate of the Bombay High Court. His past career is simply brilliant and we hope and wish that the future will be still more so. We know Mr. Vaidya to be a sound sanskrit scholar; and his scholarship in the science of Rhetoric Alankarshastra is of no ordinary merit. It would be much better if he now directs his sanskrit studies in Hindu Law and attains proficiency in that branch of sanskrit literature. Hindu law is a very intricate subject, and before it is codified, learned sanskrit scholars are much needed to expound it from original sources. It is very likely that Mr. Vaidya may be carried away by the attractions of sanskrit Rhetoric but we may suggest that Mr. Vaidya would be more useful as an expounder of Hindu Law than as a mere sanskrit scholar He has made his choice of a profession and we hope that he will now endeavour to be a great authority in it at least in the department of Hindu Law.

## THE SHARDASADAN

It is more than a year since the sharadasadan has been opened. There have been few new institutions of late so un exceptionable as this. However it is one of the peccant humours among men that they condemn every thing because it is new. The Reformation and the Revolution of course the English Revolution, the emanispation of the jews and the suppression of slavery and other like enactments or [illegible]litical innovations had to be pushed on through vehement opposition. India is positively a country of prejudice. People like every thing as Mr. Hardcastla liked it because it is old. To stem this tide of a strong conservative tendency among the people we must have leaders of that singleness of eye, rectitude of purpose, moral boldness, unflinching ambition and steadiness which characterised the great leaders of the Reformation on the continent. Until then the more the fitful such institutions the more the opposition. In spite of the prevailing feeling among the people so malicions against it and so detrimental to the dis interestedly good promoters and originarors of it the Sharadasadan is a complete success. Mrs. Hamline is storming the very strougholds of the Marhattas, with an unsparing zeal she is prepared to make a thorough and real sacrifice. She is out on a campaign. The originators of the Sadan have proved how honest endeavours triumph over idle and Mischievous opposition. The Speculative line of demarcation where good must triumph over the evil, where reason must yield and opposition begin is faint and obscure.

Pandita Ramabai created public opinion in America by her book " the High Caste Hindu woman. By her lectures and conversation the interest thus inspired led to the foundation of the American Ramabai Association pledging itself to promote the cause of the relief of high caste Hindu widows. Armed with such assistance she came over back to India after passing several years abrood. Then was founded the Sharada Sadan with the help of several Hindu friends. A thousand oppertunities were offered to Ramabsi when in America to work with Missionary societies but she knew such a service would be quite disliked by those for whom it was really to be offered and and hence she preferred to work in the way in which she has been now doing. Ramabai distinctly told her patrons in America that there was to be no effort made in the direction of proselytism to christianity and the school would be purely secular. This no doubt with held large funds which would otherwise have been easily raised; but there were some among the patrons to take a different view and give with a grace'u' hand their mite to help the most detested and appressed sub division of the whole of humanity Thus at first contributions were hard to be raised some how funds adequate to the purpose were raised. This whole will put the object of the sharada sadan in the most unmistakabie terms. The object is emphatically a charitable one. So charitable as disinterested. Such is our narrowness of mind that we are not disposed to put a charitable construction upon the doings of those who start any thing new. In an age of universal oppression, in an age of that domination which pervades the whole Indian system, to try to face however best the motives may be one class of the oppressed from their oppressors must be looked upon with no graceful eye. This was unnatural. The rest is in order. A thousand people rose to spread a thousand scandals against both the promoters of the scheme and the sharers of its advantage. This puts us in mind of the ever shaky way in which Sir Jocn Gorst gives evasive answers before the House The detractors of the Sharadasadan exerted all clandestine influence to defame it from time to time and we hope will be soon lulled to repose Their arguments often pretended to propound painful truths and were as such most detrimental to the motive which actuated the zealous and heroic woman to give birth to it " the object of the Sharada Sadan is to provide a home for young widows of the higher castes, to educate them to be teachers, to prepare them for some industry where by if thrown upon their own recources they can honestly and decently maintain themselves or if they have homes to which they may return and friends or relations to care for them the institution desires to furnish them with that mental training which will give them resources within themselves, to render them contented with their lot and make them a blessing rather than an illominous curse to their families. The school and no one connected with it has to do any thing with the Widow remarriage, nor is their the remotest motive towards proselytism. " The latter is a motive Which has always been attributed to every innovation since the begining of the English rule. For sometime it served a nucleus of grate agitation but as time advanced it proved as Worthless as it is groundless. The assurvance that has always been given as to the policy of absolute non-interference with religious faith, we hope, will remove the honest suspicions of our thinking men and silence the ominous predictions of others. The school we are quite assured is well conducted. The Pandita herselt teaches, English, Marathi and Sankrit. She also delivers lectures on natural history. She intends opening as soon as posible a training class for kindergarten teachers and also a kinder gartem school for little children. Her colleagues are Mrs. Nikambe Mrs. Demmon an American teacher sent by the Association who teaches English. In addition to these two ladies there is Mrs. De Sylva, who has charge of sewing and embroidery and two pupil teachers. The house keeping arrangements, it requires to be specially noted are all after Hindu fashion. The survices of an orthodo Bramine woman have been ēngaged for cooking. In dress, in eating in sleeping, in bathing, in every other custom every effort is made not to deviate from the long cherished and long imbibed Hindu model. " It is not the intention nor the wish to denationalise this school but in a true and broad spirit of helpfulness, to aid the people along their own best line of development. There is then absolutely no interference with customs, religion or caste regulations of any kind whatever." What better explanation, what more sincere assurance and lastly what more zealous profession of true charity do our scandal-mongers require?

For months however the numbers were hardly more than two but gradually as the ray of light of that noble and sober light, no doubt with some reflections and refractions pemtrated into the bosoms of our wild tongued mongers, as the darkness was dispelled nearly fifteen widows entered the school. The Major part of them a resident and aboarder there. Nearly the same is the number of girls who are day pupils. The majority of pupils and widows is from among the most or thodox and bigotted class of Brahmines. It must be further pressed upon the minds of our readers that none is admitted to this Sadan unless most strongly recommended by respectable persons for an irreparable personal character. The recommendations have also to undergo a hard scrutiny of an advisory board consisting of the most minute and thoughtful gentlemen there.

A moderate fee is charged in cases where pupils can pay it, yet poverty, ignorance, and age to the reasonable limit of learning offer no obstacles to admission. This is as it ought to be. Stronger cows are not pastured on a land reserved for the weaker nor are they kept from grazing ther. If by their being admitted to it they can return an equivalent amount in money. The loss is thus equal to the gain which may be further spent on the poor.. The arrangement so far is indedd satisfactory. These are the days of hard contest. It would be unjust to criticise the progress which the pupils might have made during the months of their attendance. The woman mind has no collective wisdom so naturally inherited by other societies. The hereditary tendency to mind the hearth and to regard the kitchen the sphere of the world of action must be a little bygone one to enable one to view the progress of pupils. Still even at this stage we are sure the progress must have been more satisfactory than any corresponding progress of male students. Zeal and earnestness will more than make up for social inabilities.

The institution has far advanced. It is a gratifying fact that inspite of overwhelming and overpressing difficulties the work has come to this stage. Let good arise by steps is a golden motto. It is our firm opimon that reform must be gradual rather than abrupt. An irregular conclusive policy can be shaken off and remedied by a like irregular antedote. But when the palsy is a system it is no longer apalsy. It is our element.

There are people who wish that the path of the Pandita and her colleagues ought to have been strewn with roses. Had it been so Mrs Hamlin would hardly have marched. The social inequality between town population and village population would have only been widenad Quick march is often too much to expect. Gradual development is what secures moderation in innovations and gives a lasting duration to them. To misconstrue or misunderstand the motives of the Pandita and her colleague in starting their excellent institution are in our opinion the sheer germs of that wicked drollery for which we have been ever condemned. At least if we were to lay aside our fears if we have any on the score of religious faith being interfered with we would then respond to the pleas which she and her colleagues have been so earnestly making in behalf of the education of Hindu widows. What must have indeed been her sacrifice, her zeal and her philanthropy? She may have her own frailties to which every human being is so liable. We always think with the Rev. Father chiniquay that there are two beings who are the most cruelly oppressed viz the Roman Catholic woman compelled to unfold the most secret motions of her heart to a wily clergy and the Brahmine widow deprived of every human comfort, desolate and forlorn. Has there never been in your house, readērs, no woman whose very sight to you is like the perpatual remembrance of a funeral pile? Happy, oh readers, you are, if it has not been so! ! !

## ACKNOWLEDGMENT.

We have been favoured with a copy of the prospectus of the Industrial Association of Western India. It is signed by gentle men known for their taste. We would only wish the project a heart felt success. In consequence of the limited space of our paper we could neither publish it in extenso in our columns nor offer our side remarks rhereon this time.

## वर्तमानसार

श्रीमत चिमणाबाई साहेब गायकवाड यांस पुत्र रत्न झालें. गायकवाड महाराजांचें हें तिसरें आपत्य. आमचे गायकवाड महाराज संततीं व संपत्ती या गोष्टीनीं विराजित आहेत हें पाहून फार आनंद होतो.

ब्रह्म देशांतील एका गोऱ्या वकीलानें आपल्या धंद्याला नामोशी आणणारे कृत्य केल्या बद्दल त्याची वकिलीची सनद ६ महिनें पर्यंत काढून घेतली. पुण्याच्या तुळपुळ्यासारखे गोरे वकीलही असें करतात असें यावरून ठरतें.

मद्रासची ३०,००० वस्ती असून तेथें फक्त एक दांत बांधणारा आहे हें मोठें आश्चर्य आहे असें सांगून एक पत्रकर्ता ह्मणतो कीं, मुंबईस ज्यादंच वेपास पोटपुरतेही पैसे मिळत नाहींत त्यांनीं मद्रासेस जाऊन राहावें.

काल ह्मणजे ता. ३ मिनहू रोजीं प्रिन्स फर्डिनंड यास बलगेरियाचा राजा करण्यांत गाले. हा तरी बिचारा पुष्कळ दिवस राज्य करो!

यंदा इराणांत अपूर्व पीक आलें नाहीं असें ह्मणतात. ज्या जमिनीत २०-२५ हजार मण उत्पन्न व्हावयाचें त्या जमिनीत यंदा २,००,००० मणही आलें नाहीं. नशीब शेतकऱ्याचें. अ. द.

सरकीची साखर — सरकीच्या आंतल्या मगजापासून साखर होते ती उंसाच्या साखरे पेक्षां अतिगोड असते. ही साखर तयार करण्याची कृती एका जर्मन मनुष्यानें काढली.

गुलाबांचें मोठेंझाड कालीफोर्निया प्रांतांत व्हेनचुरा येथें गुलाबाचें एक मोठें झाड आहे. त्याचा घेर तीन फूट आहे. तें मांडवावर सोडून दिलें आहे औरस चौरस १२०० फूटां वर या झाडाचा विस्तार आहे. तें फक्त १४ वर्षांचें असून त्यास रोज हजारावर फुलें येतात.

पाणी शुद्ध कसें करावें:— पाण्यांत मळ फार असल्यास एक चिमुटभर तुरटी पाण्यांत टाकावी. ह्या योगानें पाण्यांतील गाळ तळास बसून पाणी लवकर स्वच्छ होतें. तुरटी जास्त झाल्यास पाण्याच्या अंगीं कठीणपणा येतो व पाणी बेचव होतें.

६० वर्षांनीं मालक गादीवर बसला.— गंजम प्रांतांत वाली किमेडी ह्मणून एक नेटीव संस्थान आहे. तेथल्या राजास गेल्या १७ तारखेस गादीवर बसविण्याचा समारंभ झाला. हें संस्थान इंग्रज सरकारच्या हातांत सतत ६० वर्षें होतें, खजिन्यांत पुष्कळ शिलक आहे. संस्थानिकाचें वय २७ वर्षांचें आहे.

ब्रह्म देशाच्या लढाई संबंधानें आज दिन पर्यंत किती खर्च झाला ह्या प्रकारचा प्रश्न पार्लिमेंटमध्यें एका सभासदानें विचारला असतां नायब प्रधान मि. घॉर्स्ट यांनीं कळविलें कीं ४,९२,४७,००० रुपये खर्च झाला. हल्लीं तेथें लष्करी खात्याचा ११००० मनुष्यें आहेत.

लंडन येथें, अमुलिक नावाचा ४१ वर्षांचा एक हिंदु, रस्त्यांत भटकत फिरत असल्याचे गुन्ह्यावरून पोलिसानें पकडून त्यास माजिस्ट्रेट पुढें उभा केला. माजिस्ट्रेटानें अमुलिकास विचारतां त्यानें कोर्टास कळविलें कीं, माझे माल मिळकती संबंधानें खटला हिंदुस्थानांतुन प्रीव्ही कौंसिल पुढें आला होता परंतु त्या खटल्याचा निकाल माझे विरुद्ध झाल्यामुळें माझी कंगालस्थिती झाली आहे माजिस्ट्रेटांनीं सांगितलें कीं, आतां आपण हिंदुस्थानांत परत जावें. आरोपीनें सांगितलें कीं, माझें सर्व गेलें तेव्हां मी तेथें जाऊन काय करूं. माजिस्ट्रेटांनीं आरोपीस ताकीद दिली कीं, जर पुन्हा रस्त्यांनें भटकतांना सांपडाल तर तुरुंगाची शिक्षा मिळेल. नंतर कोर्टानें पोलिसास फर्माविलें कीं, ह्या मनुष्यास हिंदुस्थानचे प्रधानाचे आफिसांत घेऊन जा ह्मणजे तेथून याची खानगीची तजवीज होईल. दी० बं०

तुर्कीच्या सुलतानच्या वाड्यांत शिबंदी खेरीज करून नुस्ता सेवक समुह सहा हजार आहे. दररोज वाड्यांत अठरा हजार भाकऱ्यांचा फन्नाउडतो. फक्त मासे दर आठवड्याला दहा टन लागतात. खुद्द सुलतान साहेबांचा एक नियमित मुख्य स्वयंपाकी असून तो सोन्या रुप्याच्या भांड्यामध्यें त्यांचे अन्न शिजवितो, आणि अन्न शिजल्यावर भांड्यांनां कागद गुंडाळून मोहर करतो. मागून ते अन्न सुलतान साहेबांपुढें आणून ठेवितात तेथे मग हायचेंबरलेन या हुद्याचा एक कामगार सुलताना समक्ष मोहोर फोडून प्रत्येक पात्रांतील अन्न चाखून पाहतो, आणि मग सुलतान साहेब भोजन करतात! हा सारा बंदोबस्त कोणी विष घालतील ह्मणून.

अमेरिकेंत स्त्रिया लुगड्यांचा उपयोग करूं लागल्या आहेत. कांहीं दिवसांनीं पुरुष धोतरांचा ही उपयोग करतील असें दिसतें आमचे इकडे त्याच्या उलट प्रकार चालला आहे.

शिक्षण बुडत चाललें धुळ्याच्या हायस्कूलला पाणी लागण्याचें मार्गेच ठरलें आहे. आतां नाशिक हायस्कूलालाही नोटीस दिल्याचें समजतें. शिक्षण बुडणार.

मद्रासच्या गव्हरनर सा. चा आणि त्यांच्या कुटुंबांचा लढा महाराणी सा. च्या मध्यस्थीनें आपसांत तुटला.

ब्रॅडलॉ साहेबांच्या हातीं एक फार चमत्कारीक व महत्वाचा दस्तऐवजी कागद लागला आहे असें दिसतें. हा एक मध्य हिंदुस्थानांतील संस्थानिकांना हुकमाबाबल सूचना आहे. या संबंधीं त्यांनीं पार्लमेंटांत अंडर सेक्रेटरी आफ स्टेट फार इंडिया यांस प्रश्न विचारला, त्याचा सारांश असा होता कीं हिंदुस्थान सरकारचे मध्यप्रांताकडचे सेक्रेटरी यांनीं संस्थानिकांना तुह्मी अमृतबझार पत्रिकेचे वर्गणीदार रेसिडेंटचे हुकमाशिवाय होऊं नये, कांग्रेस सभा इंग्रज सरकारचा शत्रु आहे ह्मणून तिला मदत करूं नये, या व अशा प्रकारच्या सूचना केल्या होत्या किंवा काय व या तुमचे हुकुमानें केल्या किंवा कसें व या बद्दल आपण चौकशी कराल किंवा नाहीं? सरजान घॉर्स्ट यांनीं यांतलें आपणांस कांहीं माहीत नाहीं, परंतु आपण चौकशी करूं असें सांगितलें.

दक्षिण वेल्समध्यें गोदीत व खाणीत काम करणाऱ्या ९०,००० लोकांनीं एकदम कट करून कामें बंद पाडलीं.

चीन देशांत कोळशाच्या खाणी अतोनात आहेत व त्यांचा तपास लावून तो कोळसा उपयोगांत आणावयास लागले तर तो २४३३ वर्षें पुरेल असा अजमास आहे.

कार्डीफ येथील गोदींत काम करणाऱ्या लोकांनीं कट करून काम बंद पाडलें आहे.

कानपूर व लखनौ यांच्या दरम्यान रेल्वेचा रस्ता पावसाच्या अतिवृष्टीमुळें बंद झाला होता तो पुनः पूर्ववत सुरू झाला.

झांझीबार येथें ता० १ आगष्ट रोजीं तेथील सुलतानानें गुलामांचा व्यापार आपल्या देशांत बंद करण्याबद्दल जाहिरनामे सर्व ठिकाणीं लावले यामुळें लोकांत चळवळ झाल्याचें समजतें.

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००।= |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००= |
| सुवर्ण.... | १९॥ | रुपे | १०९ |
| आळशी खंडीस | ८३ | उडीद | ६० |
| गहू काठे | ६० | बनशी | ६५ |
| जवारी नवी | ३६ | चणे | ६० |
| रुई सर्की | ३॥= | मठ | ४। |
| तूप | ९। | तेल | ४॥। |

सट्याचे भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४३॥।= |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ९८॥ |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ८० |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ९४॥= |
| सर्की | वै. नवे सालाची | १९४७ | ३॥। |


## जाहिरात.

विक्रीस तयार असलेली पुस्तकें.

किंमतीशिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

स्त्री शिक्षण व इतिहास वगैरे पुस्तकांस मोठमोठ्या विद्वानांनीं उत्तम असे आपले पुष्कळ अभिप्राय दिलेले आहेत त्या पैकीं खालचा हा एक आहे.

Mr. G. M. Sathe, Registar of native publications in his report to Govt. for the year 1888 says:— "Among the Historical works of the year, History of the native states, chapter I, by Mr. Limaye, gives much useful information."

**१ सौभाग्य मंदीर.**

[ भाग पहिला. ] किंमत ०।२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषय.

१ स्त्रियांची योग्यता, २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म, ३ स्त्रियांचें भूषण, ४ स्त्रियांचे दूषण ५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी, ६ स्त्रियां वरील कांहींविशेष प्रसंग, (पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी) ७ शांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रांस उपदेश, १३ शकुंतलेचें राज सभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मी गर्व परिहार, १६ रुक्मिणीचीं पत्रिका, १७ सिता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनाचा मोठेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा मनोरंजक संवाद २४ स्त्रियांचें परावलंबन

२ स्त्री शिक्षण ज्ञानमाला.... ....०।२

या पुस्तकांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रियांस वाचण्यास योग्य असे पुष्कळ विषय निबंधरूपानें दिले आहेत.

३ संसार दर्पण.... .... ....०।०

याही पुस्तकांत स्त्रियांच्या संबंधानें बोधपर असे पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय आहेत.

४ मुलींची सासरीं वागणूक.... .... ....०६
५ सासुरवास चंद्रिका. (पूर्वभाग) ०७
६ सदरचा (उत्तर भाग.) .... ....०६

इतिहास विषयक पुस्तकें.

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास....०६
२ श्री सेतुबंध रामेश्वर वर्णन........०२

नेटिव राजांचा इतिहास
(भाग पहिला.) किं. ०।४ आणे.
खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१ बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर ४ किसनगड, ५ धौलपूर, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोटा, ९ टोंक, १० करवली, ११ शिरोही, १२ जेसलमिर, १३ रेवा १४ उर्वा किंवा तेहरी, १५ दतिया, १६ सावन्तुर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास २१ जावरा.

नेटिव राजांचा इतिहास.
(भाग दुसरा) किंमत १२ आणे.
यांत ६ संस्थानांचा इतिहास आहे.

१ उदेपूर. २ जयपूर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर, ६ जव्हार.

मनोरंजक विषयांचीं पुस्तकें.

१ संगीत गोपीचंद नाटक.... .... ....०९
२ गारुडी लोकांचा खेळ.... .... ....०६
३ स्त्रियांचीं मंगल कार्यें अथवा डोहाळे जेवण आणि हळदी कुंकूं. .... ....०६
४ स्त्रियांचें नेत्र कटाक्ष.... ....०३
५ न्हाणवली आणि ऋतुशांती.... ....०५
६ स्वतंत्र विधवा व त्यांच्या तरुण मुली०१
७ तरुण बायको अथवा स्त्रियांचीं स्वतंत्रता .... ....०६
८ तरुण स्त्रियांचीं मौज..........०५
९ सावित्री आणि पुरुषोत्तम अथवा अनाचाराचा परिणाम ....०३
१० बकावली....................०४

शाळांतील लहान मुलांस उपयोगी पडणारीं पुस्तकें.

१ अंकगणितसार (भाग पहिला.) ०३
२ तोंडचे हिशेब (भाग दुसरा.) ०।२
३ हिंदुस्थानचा भूगोल........०१
४ महाराष्ट्र देशाचा इतिहास....०१
५ सदरची जंत्री........०१
६ अंकलिपी. (सचित्र.)........०।६

या शिवाय आह्माकडे आणखी दुसऱ्या तऱ्हेची पुस्तकें मिळतील व्यापारी लोकांस चांगलें कमिशन देऊं

हीं सर्व पुस्तकें उमरावती येथें "प्रमोदसिंधु" छापखान्यांत व खालीं सही करणार यांचे कडे रोख किंमतीनें अगर व्हाल्युपेबलनें मागविल्या असतां पाठविलीं जातील.

विठ्ठ० जी० लिमये.

पत्ताः— कांदेवाडी मुंबई गिरगांव पोष्ट.


हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ३ " ३ "
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास..........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
फेर छापेस ........०।

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR


VOLXXIV AKOLA MONDAY AUGUST 25 1890 NO 33

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २५ माहे आगष्ट सन १८९० इ० अंक ३३



डा. वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खाली लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार, (गरमी) व त्याजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सुज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोक्याची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

याप सून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता होऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गोतमराव केराव, मुंबई.


वऱ्हाडसमाचार

मिती अधीक शुद्ध १० शके १८१२

आज बरेच दिवस पासून कलकत्ता हायकोर्टांत नवऱ्यानें आपल्या अल्पवयी स्त्रीशीं जबरीनें संभोग केल्या बद्दल एक खटला चालला होता. त्याचा निकाल कांहीं दिवसां पूर्वी झाला. आरोपिताची स्त्री फुलमुनी दासी ही झालेल्या दुखापतीनें लवकरच मरण पावली होती. जुरीनें आरोपितावर निष्काळजीपणाचे व अविचाराचे कृत्य करून जबर दुखापत केल्याचा आरोप लागू आहे असें मत दिलें. जुरीत एक मुसलमान व बाकीचे सारे हिंदु होते. माजिस्ट्रेट साहेबांनीं आरोपितास एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा दिली. या संबंधाने जास्त जी हकीकत बाहेर आली आहे त्या वरून असें समजतें कीं फुलमुनी दासीचा व तिचे नवऱ्याची या पूर्वीं कांहीं वेळ शरीर व्यवहार झाला होता व डाक्टराचें मत ही असें होतें कीं या पूर्वीं असा व्यवहार झाला असावा. या वरून हे जर खरें असेल तर या गोष्टीस जसें पूर्वीं स्वरूप आलें होतें तसा कांहीं प्रकार नव्हता असें दिसतें व हा विकळ विलक्षण प्रतीचा अपघात झाला असावा असें वाटतें.

असो, या गोष्टी मुळें वर्तमान पत्रांतून वगैरे बरीच चळवळ सुरू झाली व अजून ही ती चालूच आहे. या संबंधानें सरकारास दोन सूचना झाल्या आहेत. पहिली सूचना पिनलकोडा मधील वयामध्यें फेरफार करण्याची व दुसरी लग्नांची वयें कायद्यानें ठरविण्याची. पिनल कोडा प्रमाणें १० वर्षां वरील बायकोशी तिचे नवऱ्याचा शारीरिक व्यवहार जबरी संभोगा खालीं येत नाहीं. ही वयाची मुदत १० आहे ती वाढवावी म्हणजे १२ किंवा १४ करावी असें कित्येकांचें म्हणणें आहे आज पर्यंत कोर्टापुढें असले खटले फारसे आलेले नाहींत वयाची मुदत वाढविण्याची सूचना करणाऱ्याचें मत असें आहे कीं, असें प्रकार फार घडतात पण बाहेर येत नाहींत व ही मुदत वाढविल्यानें असें प्रकार घडणार ही नाहींत आतां केवळ वयाची मुदत वाढविल्यानें व पोलिसाचा अधिकार जशाचा तसाच ठेविल्यानें असले प्रकार बंद होतील किंवा बाहेर येतील असें दिसत नाहीं. कारण असें प्रकार आज पुष्कळ घडताहेत असें घेऊन चाललें तर हें कबूल केलें पाहिजे कीं त बाहेरतर येत नाहींत व पोलिसाचा अधिकार तर जशाचा तसा राहणार तर वयाची मुदत वाढविल्यावर ही ते तसेच्या तसे राहाण्याचा व बाहेर येण्याचा आतां इतकाच संभव आहे. आतां दुसरें लोकांचे मनांत कायद्याची भिती राहून ते अशा गोष्टी करणार नाहींत तर यावर हेंच उत्तर कीं ही कायद्याची भिती फारशी उपयोगी पडणार नाहीं कारण एक तर अशा गोष्टी बाहेर येण्याला फारसा मार्ग नसतो; व दुसरें अशा गोष्टी मनोविकार प्रबळ झाल्यावांचून होत नाहींत. आता एवढे मात्र होईल कीं जर एखादी स्त्री १४ वर्षांचेंआंत ऋतुस्नात झाली तर तिचा गर्भाधान विधी मात्र अगोदर व्हावयाचा नाहीं ही गोष्ट होणें इष्ट ही एकपरी असेल तरी यांत थोडेंसे लोकांचे रीतीचे आड आल्या सारखे होतें कारण स्त्री ऋतुस्नात झाल्या बरोबर विधी उरकून टाकण्याची चाल आहे व दुसरे आमचे लोक हा बंध घालून घेण्याला किती तयार आहेत हें पाहिलें पाहिजे. कलकत्ता हायकोर्टांत हा खटला चालला असतां जरी हा खटला जबरी संभोगाचे सदरा खालीं येत नाहीं तरी कायद्याचा उद्देश सर्वांच्या जिवाचे व मालमत्तेचें रक्षण करणे हा आहे व म्हणूनच हा खटला जबर दुखापतीचे सदरा खालीं येतो असा निकाल झाला होता परंतु हे लक्षांत ठेविलें पाहिजे कीं फक्त असे दुखापतीचे मात्र खटले या मुद्यावर सुटणार नाहींत परंतु सर्व गोष्टींचा विचार करितां कायद्या मध्यें फेरफार करून फारसा ऊपयोग होणार नाहींसें दिसतें व जो थोडा बहूत उपयोग होईल तो दुसरी कडून ही होण्याचा संभव आहे. कारण जर लग्नाचीं वयें वाढलीं गेलीं तर अर्थात कायद्यांतील या कलमांतील वयें वाढल्या सारखी होतील.

दुसरी सूचना अशी झाली आहे कीं मुला मुलींचे लग्नाचे वया संबधानें कायदा असावा व त्यांत त्यांचीं वयें मोठीं ठेवावीं. आतां कायद्याचे संबधानें दोन मोठ्या गोष्टी लक्षांत ठेवण्या सारख्या आहेत. एकतर कायद्यानें समाजाचें कल्याण होतें व ज्या गोष्टी होणें थोडेंसें अशक्य त्या गोष्टी लोक कायद्याचे भीतीनें करूं लागतात. त्याचें ढळढळीत उदाहरण सतीच्या बद्दलचा कायदा हें होय -- पण जर हाच कायदा पुष्कळ लोकांचे अगदीं मना विरूद्ध असला तर समाजाच्या स्वस्थ तेला धक्का येतो या साठीं कायदा करणें किंवा मागणें ह्या दोन्ही गोष्टी फार नाजूक आहेत; व या बद्दलचे ताजें उदाहरण सर्वांच्या ध्यानांत असण्या सारखें माधव बागेची सभा ही होय. कांहीं लोकांचे व मुख्यत्वें करून इंग्लिश लोकांचें मत असें आहे कीं हिंदुलोक सुधारावयाचे नाहींत; त्यांनां कायदाच पाहिजे; त्यांचे त्यांनां कांहीं कळावयाचें नाहीं. प्रसिद्ध मलबारी शेट हे इंग्लंडांत या संबधानें जारीनें खटपट करित आहेत. व इकडे या संबधानें कायदा असावा अशा विषयीं इंग्लडांतील लोकांची मनें वळवीत आहेत आमचे मतें कायद्यानें आपणास बांधून घेण्यास आमचे लोक आज तयार झाले नाहींत. अशा समाज संबंधीं व धर्मसंबधी बाबदींत सरकार हात घालते आहे हें त्यांस रूचणार नाहीं. आतां सती जाण्याची चाल ही अशीच वाईट होती व ती संबधानें कायदा केल्यामुळें तीचा अजीबांत बी मोड झाला व त्यामुळें लोकांनी सरकारानें या धर्मांचे बाबदींत हात घातला ह्मणून कोणत्याही रीतीची चलबिचल दाखविली नाहीं. हें कबूल आहे परंतु तेव्हांचे व आताचे स्थितींत फार फरक झाला आहे असें अगदीं वरवर पाहणाराला सुद्धां दिसून येईल आज अलीकडील ५० वर्षांत लोकांचे रितीभातींत आचार विचारांत फार फरक पडला आहे व ह्मणून कायद्याचा जसा त्या वेळीं परिणाम झाला तसाच आतां होईल हें संभवत नाहीं याचे नुकतेच उदाहरण हीं वाचकांचे लक्षांत असेलच, बाल विवाहाचे वगैरे संबधानें कायदा मागणाऱ्या विरुद्ध लोकांनीं जो अर्ज सरकारास दिला होता तो अजून वाचकांचे स्मरणांत असेलच. यावरून आज लग्नाचे वया संबधानें कायदा असावा किंवा नसावा हें ठरविणें फार कठीण आहे तरी आणखी कांहीं थोडे दिवस तरी वाट पाहावी व मग काय करणें तें ठरवावें हें बरें, एकंदरीनें सर्व गोष्टींचा विचार केला तर हें स्पष्ट दिसून येईल कीं आज आमच्या समाजा मध्यें हळू हळू सुधारणा होत आहे समाज सुधारणे संबधानें हें लक्षांत बाळगलें पाहिजे कीं समाज सुधारणा एकदम कधीं ही व्हावयाची नाहीं. व तसें होण्याची इच्छा करणें हें वेडेपणाचें काम होय आज जर थोडी थोडी सुधारणा होत आहे तर आणखी थोडे दिवस दमधरला तर आज ज्याला कायद्याची अवश्यकता म्हणून दिसते आहे त्या गोष्टी आपोआपच प्रचारांत येतील. दुसरी गोष्ट आमच्या मध्यें पूर्वीं मोठेपणीं लग्न होत यांत कांहीं संशय नाहीं परंतु ही बालविवाहाची घातुक चाल आमच्या मध्यें आली व ती वाईट आहे हें निर्विवाद आहे परंतु ही चाल फार दिवस आमच्या मध्यें असल्यामुळें निदान त्या चालीमुळें आमच्या आचार विचारांत फार फरक पडला आहे व त्यामळें अह्मास हें बंध एकाएकीं तोडून टाकतां येणार नाहींत, व तसें करणें हेंहीं इष्ट नाहीं.

समाज ह्मणजे पुष्कळ व्यक्तींचा समुदाय आतां खरें ह्मटलें ह्मणजें व्यक्ती सुधारणा हीच समाज सुधारणा आहे. तर प्रत्येक मनुष्यानें आपल्या कुटूंबांत मित्र मंडळांत आपल्या त्यानें होईल तितकी, चांगली दिसेल तशी सुधारणा करण्याचे मनावर घेतलें ह्मणजे झालें. समाज सुधारणा झालीच ह्मणावयाचें, या साठीं प्रत्येक कुटुंबांतील मुख्य मनुष्यानें ही कलकत्या कडील गोष्ट लक्षांत ठेवून देश का

ळु वर्तना प्रमाणें वागावें ह्मणजे सुधारेच्छु लोकांनीं सरकारापाशीं तोंड पसरायाला नको व सरकारालाही आमचे सामाजीक व धर्म संबंधीं सुधारणेंत हात घालावयास नको खरोखर अज्ञाला दुसऱ्यांनीं हें चांगलें, हें करा असें सांगावें इतकेंच नव्हे तर असें शिक्षेच्या भयानें करावयाला लावणें हें हिंदुस्थानच्या आतांच्या स्थितीला शोभत नाहीं. या रीतीनें या बाबतींत लोकांत लवकरच सुधारणा होऊन आमचे लोक या अकार्भाईचे फेऱ्यांतून सुटतील अशी आह्मी मनापासून इच्छा करितो.

---

इंग्लंडात आमचा कैवार घेऊन आमच्या करितां अश्रांतश्रम व खटपट करणार मि. डिगबे मि. ह्यूम सारखे सन्मानीय पुरस्कर्ते जर आम्हास मिळाले नसतें तर ह्या अंग्लोइंडियनांनीं काय काय अनर्थ केले असते हे सांगता येत नाहीं. आमच्याच पैशावर चरून इंग्लंडातील लोकांच्या मनांत आमच्या विषयीं भलभलत्या गोष्टि भरवू देण्याचा ह्या लोकांनीं विडाच उचलला आहे कीं काय हें कळत नाहीं. परंतु वरील परोपकारी गृहस्थ अशा खाल्लेल्या घरचे वासे मोजणाऱ्या मंडळीची योग्य वेळीं कान उघाडणी करून खरा प्रकार आमच्या दयाळु इंग्रज लोकां पुढें मांडण्यास कधीही मागें पुढें घेत नाहींत हे त्यांचे आमच्यावर खरोखरच महत उपकार आहेत.

इकडून गेलेले डेलीगेटांचे दुष्काळ संबंधी बोलणें खोटें ठरविण्याचा प्रयत्न करून तेथील एका प्रत्याहिक पत्रकारानें म्हटले आहे कीं, १८७३ सालीं बीहार मध्यें मोठा भयंकर दुष्काळ पडला होता त्या वेळीं सरकारें ७ कोट रुपये खर्च केले त्याच प्रमाणें दहा वर्षामागें म्हैसूर व मद्रासेस दुष्काळ पडला होता तेव्हा सरकारनें योग्य मदत करून लाखों लोकांचे प्राण वाचविले आणि आतांतर दुष्काळ येण्याची भितीच नाहीं, इंग्रज लोकांचे हातीं राज्य कारभार येण्याचे पूर्वी लाखों लोक दुष्काळानें प्राणास मुकत असत तरी त्यांची कधींच दाद लागत नसे. वगैरे. परंतु मि. डिगबे यांनीं ह्या पत्रकाराची चांगली कान उघाडणी केली आहे व हात धुऊन आमच्या पाठी मागें लागले ल्या प्रसिद्ध सर रिचर्ड टेंपल साहेबांचा आधार घेऊन लिहिण्यांत केवढा मोठा प्रमाद होणार आहे हें स्पष्ट करून दाखविले आहे. बीहार प्रमाणें म्हैसूर आणि मद्रास येथें दुष्काळात मुळींच व्यवस्था ठेवण्यांत आली नाहीं. बीहार मध्यें तिन कोटी प्रजेत फक्त अन्ना वांचून चोवीस पंचवीस मनुष्यें दंगा बळी परंतु म्हैसूरास चारास एक मनुष्य ह्या दुष्काळा प्रत्यर्थ बळी द्यावा लागला व मद्रासेस सुद्धां एक त्रितिआंश लोक प्राणांस मुकले! इंग्रज सरकारच्या अमला पूर्वी पडलेल्या दुष्काळांचे भयंकर स्वरूपाची कल्पना करण्यास आधार नाहीत तरी आतां सारख्या सोई पूर्वींच्या लोकांना मुळींच नव्हत्या. हैदराबादेस दुष्काळ पडला होता तेव्हां निजामाची आमच्या दयाळू सरकारापेक्षां फारच उत्तम व्यवस्था ठेविली होती त्यावरून पूर्वी दुष्काळांत सर्व लोकांस अन्न पाण्यावाचुन मरावे लागत असे असें विधान करणें थोंड धाडसपणाचे होणार आहे.

ह्या शतकाच्या आरंभीच्या पन्नास वर्षांत तेरा दुष्काळ पडले होते व त्या काळांत दुष्काळानें पन्नास लक्ष लोकांची प्राणहानी झाली परंतु १८६०पासून वीस वर्षांत एकंदर १६ वेळ निरनिराळ्या ठिकाणीं दुष्काळ पडून प्राणहानीची संख्या १२०२१४०० पर्यंत पोहोचली आहे! इंग्रज सरकारच्या छत्राखालीं हिंदुप्रजा अबादानीत आहे ह्मणणारे अॅग्लोइंडियन वरील दिलेल्या आंकड्याकडे नजर फेंकतील व चार चार वर्षे जरी पाऊस पडला नाहीं तरी न डगमगणाऱ्या लोकांचे एक वर्ष पाण्यानें दगा दिला तर तोंडचें पाणी कसें पळतें ह्याचा थोडा तरी विचार करण्याची तसदी घेतील तर बरें होईल परंतु त्याच्या शिवाय जो पर्यंत अव्याहत भरण्यात कांडी इतकीं ही कसूर होत नाहीं तो पर्यंत आमच्या खऱ्या स्थितीचे अनुमान त्यांच्या कडून कशा प्रकारचे होणार हें उघडच दिसत आहे व 'दुनीया अबाद' अशा प्रकारचे त्यांच्या तोंडातून उद्गार निघणें साहजिक आहे. सत्राव्या शतकांत दोनदाच, अठव्या शतकांत फक्त आठ वेळांच ज्या दुष्काळाची धाड या देशांवर आली होती तीच धाड एकविस वर्षाच्या काळांत सोळा वेळ यावी हेंच आमच्या उत्कर्षाचे सुचिन्ह !!!

दुष्काळ पडला असतां मदत व्हावी ह्मणून वर्गणी करून गोळा केलेल्या पैशाची तरी व्यवस्था लावण्यात अन्याय करण्यात कसूर झालेली दिसत नाहीं आणि अशा प्रकारचा निराळा पैसा मुळीच जमविलेला नव्हता असें ह्मणून लागलीच कांहीं महिन्यांनीं, तो पैसा पुन्हा परत केला असें प्रसंगास अनुसरून बोलणाऱ्या सर टेंपल सारख्या माहात्म्यांवर विश्वास ठेवून इच्छेस येईल तशा प्रकारच्या वल्गना करण्याची आमचे इंग्लिश पत्रकार सोडून देतील तर फार बरें. सुमोर वीस कोट रुपये दुष्काळ निवारणार्थ अन्नान्न गत झाले ल्या व करानें अगोदरच मेरीस आलेल्या गरीब शेतकऱ्यां पासून उपटले असून व ह्या रकमेचा व्यय फक्त दुष्काळ निवारणार्थच करण्यांत येईल असें पूर्ण वचन दिले असूनहील्या पैकीं बहुतक रकमेचा फन्ना अफगाण व ब्रम्हदेशांच्या लढाई मध्यें उडाला; दुष्काळा करितां जमविलेला फंड नव्हताच असें म्हणून अंगावर बाजू येते असें दिसून येतांच, इतर कामा कडे खर्च झालेले त्या फंडातलि पैसें पुन्हां जमा केले असें म्हणून उडवाउडवी चालविण्याचा घाट घालीत आहेत परंतु ते ही निवळ खोटे ठरूं पहात आहे. टेंपल साहेब तर असें ही म्हणण्यास मागे पुढें पहात नाहींत कीं, हिंदुस्थान आतां धनाढ्य बनत चालले आहे, त्याला एक पैसा सुद्धां कर्ज नाहीं. दुष्काळ व दोन लढायांस पैसे पुरवूनही हिंदुस्थानच्या खजान्यांत शिलक आहे. इ० परंतु वास्तविक दुर्दैवानें खरी स्थिती अगदीं निराळी आहे. १८७८ पर्यंत डिश कोट रुपये हिंदुस्थानास कर्ज हाेत आणि तेच कर्ज १८८७ साला दोनशे कोटी रुपये झाले! अशी खरी स्थिती असून हिंदुस्थान अबादानीत आहे असें म्हणणाची धन्य आहे! चंद्र सूर्य आहेत तों पर्यंत 'टेंपलशाही'ची आठवण राहील असें ऐकण्यांत येतें त्यांत कांहीं तरि तथ्य आहे खरें. आंग्लभूमी जों पर्यंत असली रत्नें प्रसवते आहे तों पर्यंत आमचा उत्कर्ष होणें स्वप्नवतच होय.

पार्शी लोक नाहींत असा मुलुख विरळा! अशा प्रकारचे कित्येकांच्या मुखांतून उद्गार निघतांना आह्मी ऐकिले आहेत आणि ते अक्षरशः खरे आहेत. सर्व हिंदुस्थानभर या लोकांचा पसार आहे. विलायतेस आहेत आणि त्यांचेच ज्ञाति बांधव प्रसिद्ध दादाभाई नवरोजी होत. आस्ट्रेलियांत आहेत, ब्रह्मदेशांत आहेत आणि कधीं कधीं प्रश्न निघतो कीं हे नाहींत कोठें! हे विचार आमच्या मनात घोळण्याचें कारण असें कीं थोडे दिवसा पूर्वी एका पार्शी गृहस्थानें चीन देशांतील हांगकांगहून एक प्रवासाच्या वर्णना दाखल पत्र धाडिलें आहे. व्यापाराच्याच पेषानें कांहीं पार्शी लोकांनीं तिकडे चिनमध्यें मंडळ्या काढल्या आहेत. सारांश, उद्योगानें या लोकांनीं आपला फैलाव केला आहे आणि त्या पैकीं सुयोगानें कांहींजण आपल्या वऱ्हाडच्याही वांट्यास आले आहेत त्या प्रमाणें घर सोडून जाण्याचा काल आपणावर समीप येत चालला आहे आपणा जवळ दिवसें दिवस त्राण राहिलें नाहीं. देशाटणास आपण प्रवृत्त झाले पाहिजे आणि ज्या योग्य साधनांनीं आपला उत्कर्ष होईल तिकडे वळलें पाहिजे. आपल्या अशा उद्योगाला पार्शी लोकांचा कित्ता बरा.

---

आमच्यावर रा. रा. गोपाळ कृष्ण देशपांडे इसरोळीकर यांणीं डिफेमेशनची फिर्याद येथील माजिस्ट्रेट यांचे कोर्टांत केली होती, ज्या मजकुरा बद्दल त्यांची फिर्याद होती तो मजकूर खोटा आहे असें आह्मांस समजल्या बरोबर आह्मी त्यांची माफी मागितली. व रा. रा. गोपाळरावजींनीं ती फिर्याद पुढें चालविण्याचा आपला इरादा नाहीं असा तारीख २३ माहे मजकूर रोजीं कोर्टांत अर्ज दिला. माजिस्ट्रेटानीं त्या अर्जा वरून ती फिर्याद काढून टाकिली. झालेला निकाल चांगला झाला असें आम्हा प्रमाणेंच येथील सर्व सूज्ञ जनास वाटत आहे. "मानो हि महताम् धनम्."

---

# The Berar Samachar

MONDAY, AUGUST 25, 1890.

## WHAT WILL THE RISE IN EXCHANGE DO?

Exchange has gone up far too quickly to enable one to state definitely, judging from the existing facts to what extent the future values of Indian produce will be affected. While accepting the views of the chairman of the Bank of Bombay as to the influence of exchange upon present prices one must receive with caution his forecasts and reflections. He states that the whole produce of India has suddenly been reduced in value by 15 or 20 per cent. With one or two important exceptions to which we propose to refer this statement seems to be correct for the present time. If he means by this statement that the value of Indian produce has been lowered for all time to the extent of the rise in exchange or nearly so he is taking for granted what he has to prove. As regards the ryots or farmers who primarily produce the wealth of India the bare statement itself is not correct. They get full prices for their cotton. The middlemen, the native merchants and their correspondents, the wealthy firms up country are the immediate sufferers. They are doing their best to bear with equanimity the loss of Rs 30 to Rs. 40 per candy upon all the cotton they have purchased and stored.

"Forward contracts for next year's cotton crops are being made at fully Rs 20 to Rs 25 below those ruling for similar contracts during the season just passed. That however does not prove that the ryots will be obliged to accept these reductions in prices. They will not sell their crops till harvested and that will give time for the consequences of the high exchange to be manifested more markedly than has been possible as yet. Our only object in writing this is to give a note of warning. If their ever existed a time for speculators to be guarded and cautious it is this. The worlds trade is just now and will be for months to come at the mercy of speculators in silver mostly the Americans the acutest dealers in the world. We here can not hold a candle to them. We here have no facts to guide us in future operations. Just as no one here can say what kind of monsoon weather we shall have next week because the weather facts are at present in the middle of the Indian Ocean for the same reason no one can now prophesy what the values of Indian produce will be four or six months hence.

No doubt some slight indications for the future do still exist. Manchester prices have been continually hardening for months past and the Lancashire mills are in the full work at remunerative prices. At this time last year the out look was so bad that all these mills were on half time. Similarly Liverpool and New York cotton prices have also been for months past with slight exceptions to the contrary continually rising in spot and future quotations. The important terms of produce to which we referred at the commencement of this are wheat and also we are disposed to believe rice.

The chairman was to blame in not plainly stating that he excepted the food grains or cereals from his generations, We intend referring only to wheat When exchange was at 15.5d quotation for wheat of the first quality was Rs. 4-8 per cent. The exchange has now risen to 15,7½d wheat ought to have fallen to 3—14—9. But it has slowly fallen only to Rs. 4—7—0 at this figure it has remained steady these two months. The fall from 4—8 to 4—7 or the fall by one Anna is proportionate to a rise from 155d to 155¼d. This shows pretty clearly that if exchange is the cause of the fall in cotton it can by no means be the cause of the steady prices of wheat.

It is no time to discuss how exchange affects values. It is enough to state that the price of our wheat ruled the price of the world's market in wheat, for it is produced by the most low paid cultivators in the world. The rate of wages here is at the most 3 annas a day. Our wheat will not appreciably fall in price. and in accordance with the iron law of wages, as the cultivators are already working at the lowest wage at which they can propagate and support their families, crores of them have only sufficient wages to purchase a single meal per day. The next lower step is an inevitably dire famine over a greater part of the country not because grain is not available but because the poor or rather the cultivators cannot pay the price asked for it. As the Rupee price of wheat does not for this reason fall in India and as it is all wanted by Europe when exchange goes up the sterling price of wheat must rise in proportion.

It is not proved that a rise in exchange is a bad thing for the people. The deduction to be drawn is that as the wages of Europe and America are thus

based upon the sterling price of Indian wheat which varies directly in proportion to the price of silver or the rate of exchange, therefore wages will rise with the sterling price of Indian wheat and the price of all natural products and goods produced by labour will also rise inevitably in the same proportion. That this deduction has been proved to be correct by the permanent depression of trade and fall in prices of the past seventeen years is undoubted. Does it indicate the consequences to the world's trade of the rise in silver? We may expect that as soon as wages have had time to adjust themselves the prices of cotton and manufactures will rise in proportion to the rise in exchange and thus the prices of Indian cotton too will come back to their old figures. The last year's wheat crop in India had been poor and that may be the cause of the present steadiness of the wheat prices. We are not however disposed to believe this we only counsel next year's speculations be guarded.

## ELECTRICITY A SUBSTITUTE FOR HANGING.

To many a sensitive and scrupulously humane mind electrocution is a hopeful theory. It is anxious for moulding it into practice. This experiment has at earth been tried in the United States It was tried at the cost of what must have been altogether inconceivable agony on the part of the victim. It has proved a failure. Three shocks had to be administered before the end was reached. The condemned man's struggles lasted several minutes. The new process of course in theory was entirely painless. The prisoner sat in a chair specially constructed for the purpose with his arms, feet and body in touch with the electric conductors. A similarly connected cap was placed on his head. At a particular juncture in the funeral service a button was pressed and the circuit from a powerful battery completed and without a pang the criminal passed into eternity. This the theory. In practice the man Kemmler upon whom it was experimented was the only man who was tortured to death. Sentenced at the beginning of April last the man lay in prison uncertain of the hour on which the doom would fall on him for four months. This was one of the refinements of cruelty that prevail in America. A similar instance in any other free state would have excited columns after columns in newspapers. During all that period not a hint was conveyed to him of when or how or where he would have to pay his penalty Nor we are told though separated from that continent by such an immense distance was he informed if he would have to pay the extreme penalty. He was about thirty A born wonderer never learning a trade and living as best as he could at 27 he got himself married. The day after his wedding he learned that she had a husband living. He went utterly to the bad then and eventually ran away to an other town with another woman. She was a drunkard. He became one also and one night, hard drunk and intoxicated, they had a row about a few cents, and he struck her with an axe. The next morning she was dead. That night in the Police station cell he was plied with as much liquor as would involve him in a confession sufficient to convict himself. This also is an admirable American method. The sentence of Kemmler was "that the Warden do send through his body a current of electricity of sufficient intensity to cause death and do continue that current till he died," describing the death chair by means of which this sentence was to be carried out, the electrician who made it said that ten seconds would be the longest period possible to elapse between the completion of the circuit, and the actual occurrence of death. At first it was decided that the current should pass the condemned man's body from head to foot, and a shoe with a copper sole to which a wire could be attached was made ready. Later on however, the plan was abandoned and it was decided to pass the current through his body from his head to the small of his back. A rubber cap electrically connected and depending from a small gallows-like structure rising from the back of the chair was prepared for his head and a somewhat similar but smaller rubber disk containing a plate of metal, a sponge and a coil of copper wire. This was fastened low down to the back of the chair upon which he was seated, and through which it was connected with the death bearing wires. When the condemned man took his seat the top of his head was to be closely cropped and part of his back bared. For "the sixteen seconds that it takes to fit him in his chair he will feel the warm water from the two sponges on his head and his back. That will probably be the only sensation of dying he will ever know. Before he can feel the force of the current that will enter at these two points of the body he will have ceased to exist. The speed of the current is so much in excess of that of the nerve currents of the human body that it parsyses every action, every feeling, every particle of life in every part of the body before the nerve currents can convey the sensation of pain or in fact any kind of sensation to the brain. In fact the brain itself gives out at the same point of time as the rest of the body." This was the theory of the physician before the electrocution took place. The fatal moment arrived. Several minutes elapsed. Shocks after shocks were administered and yet one more was wanted from a powerful Westing house dynamo. The unhappy man's life could not terminate. Spectators became wild. At length after terrible agonies the culprit paid his extreme penalty and died.

The moral of all this in our opinion is that this miserable failure may bring us yet one more step nearer to outcry against the system of capital punishment in our countries. Warning is we admit one of the ends of punishment. To remove the criminal from society to which he would be dangerous is also the principal end of punishment. But can this object be not served by any other expedient? If it can be then to take life for life would only justify the common assertion that man is vindicative and is not satisfied until a like injury were inflicted upon the malefactors. If Kemmler's agonies awake legislators to remorse and pity we believe his agonies will deserve martyrdom.

## LEPROSY QUESTION

In their recent resolution in respect of the question of segregation of Lepers the Government of India have refrained from legislating on this matter. There are many in the country who find fault with the Government Resolution but we must frankly admit that our contemporaries are misled in censuring Government and we are not at all ashamed to declare that Government has done a very will thing in not resorting to legislation for a question of this kind.

Indays of yore, the ancient religions placed severe restrictions upon lepers They prohibeted them from mixing with the crowd and imposed heavy penalties upon them. The Jewish and the Hindu relegions are at one on this point. when religion lost its influence as ruler of men in temporal offairs the secular rulers did not put the lepers under hard conditions and they mingled with the rest of the society as persons free of the disease did.

Now has arrived the moment when people have begun to think that persons affected with leprosy should be segregated and placed under penalties and restrictions the feeling in their respect arises from the danger which people apprehend should they happen to have any touch with diseased people. The medical opinion seems to favour this apprehension. Whatever may be the origin of this sentement it is certain that Government cannot and ought not to legislate in this matter so hurriedly If it be found necessary to introduce a measure of this kind it should have no exceptions. All lepers whether rich or poor should find no shelter in the society of men and women. Such a whole sale legislation would violate vested rights and put innocent and harmless people to all sorts of troubles and trials which they do not deserve.

There is a great difference between the opening of charitable asylums for lepers and passing restrictive enactments to prevent them from mixing in society. The former is a remedial measure and does not interfere with the liberty of the subjects while the latter deprives people of their birth right. People of large means would naturally refuse to go to a place where they are deprived of the comfort and help of their relations. People of no means but well connected would dislike the idea of being sent to some lonely place without the least shadow of homely happiness. Their relations would object to such a procedure as this. To deprive a people of their birth right requires more cogent reasons than those offered at present. Syphilis is a contagions disease but persons affected by it are not thrown into a prison house. The contagions disease Act was abrogated by the Parliament of England, The one is as dangerous as the other.

There is no restriction whatever placed upon charitable people to open institutions where the diseased people will find kind treatment and great attention paid to them. Do hold out all inducements by which people will find it rather a pleasure to resorts to these institutions than to live at home under very disheartening and disappointing circumstances. It is no small gratification to learn that Mr. Ackworth M, Commissioner of Bombay should have been able to collect half a lac of rupees toward the erection and maintenance of a home for lepers. But to ask the supreme Government to pass a measure by which lepers will be deprived of their liberty is an absurd thing. The fact of the matter is that there are very few powerful voices amongst persons affected by the disease who would make a stand against the attempts of the people to deprive the lepers of their liberty.

A time may come in the future when people will be quite accustomed to go to institutions where particular diseases are treated and would rather shun society than seek it. Then such a measure may be proposed and passed.

There is at present a divergence of opinions as to the fact whether leprosy is after all as contagious a disease as some have thought it to be. Some scientists even go the length of declaring that it is not contagious at all. It is as curable as as similar other diseases are. Therefore the Government acted very wisely in not taking a sudden leap in the dark to deprive as such a measure would do the birth right of all people whether high or low.

## वऱ्हाड.

हवामान–पावसानें मागील आठवड्या पासून सांगली उघाडी दिली आहे.

गेल्या आठवड्यांत येथें सेशन भरलें होतें. गोपाळखेडें येथील एका ठाकुरानें रागाच्या भरांत आपल्या मुलाच्या डोक्यांत लाकूड घातलें. तों तें मर्मी लागून तो मेला, हा एक खटला होता. आरोपीस ११ दिवसाच्या कैदेची शिक्षा झाली.

या आठवड्यांत आह्मास दोन मृत्यु कळवावे लागत आहेत! एक रा. रा. एकनाथ लक्ष्मण वकील उमरावती यांचा; दुसरा रा० केशव विष्णु ओक वकील मलकपूर यांचा; दोन्ही गृहस्थ कांहीं दिवसांपासून आजारी होते, पण वारंवार विशी एकूणीशी ऐकूं येत असल्यानें या दुखण्यांतून ते उठतील अशी आशा होती, पण शेवट ती निष्फल झाली!

रा. केशव जयकृष्ण ए. अ. कमिशनर यांस वाशिमास बदलले.

अकोलें शहरा करितां रा. सा. देवराव विनायक यांस सेन्सस सुपरिंटेन्डन्ट नेमलें आहे. त्यांनीं गेल्या बुधवारी टौनहॉलांत सर्व सुपरव्हाईझर व एन्युमरेटर मंडळी जमा करून कामाची वांटणी केली व काम कसकसें करावयाचें या संबंधानें त्यांची समजूत करून दिली. ही मंडळी आतां लवकरच कामास आरंभ करील. शहरा करितां ११ सुपरव्हाईजर व ११३ एन्युमरेटर नेमले आहेत.

## नोटीस.

नोटीस बेसमी विठु वल्द रावजी आवटे अज्ञान पालन करणार मातोश्री बापजी मर्दरावजी आवटे राहणार सोनखास तालुके आकोलें यास खाली सही करणार याजकडून देण्यात येतें कीं मौजे मजकूर येथील तुमचे उदमांत काम करण्या करितां आंग भागणीचा ठराव करून सर्व उदमांत आठवा हिसा देऊन काम करण्यास लाविलें. मात्र शेतीस लागणारी लागवड तुम्ही लावावा सरकारी सारा मी आपले हिशाचा द्यावा. या प्रमाणें ठरल्या वरून सर्व खरीपाचा पेरा केला व डवरणवा एकेरही दिला. हल्लीं कांहीं कारण नसतां मला येण्यास मना केलें आहे सबब या नोटीसिनें कळवितो कीं ठरावा प्रमाणें नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत काम करण्यास पूर्वी प्रमाणें परवानगी द्यावी. असें न केल्यास माझें हिशा बद्दल होणारें नुकसान व नोटीशीचा खर्च या सुद्धा दावा करीन कळावें ता. २३।८।९०

( सही )

मारुती वल्द भोनाजी लढम

राहणार मौजे सोनखास

हातची निशाणी खुद्द

## वर्तमानसार

राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांपैकीं बाबू डब्ल्यू. सी. बानरजी हे येत्या शुक्रवारीं विलायतेस जाण्यासाठीं निघणार आहेत ही मोठी आनंदाची बातमी होय.

मिठावरील करांचे उत्पन्न कमी होईल असें पार्लमेंटांत सरजान गार्स्ट हे बोलले व त्यांपैकीं कांहीं भाग कमिन फंडाला परत द्यावयाचा सरकारचा विचार आहे.

एक वर्तमान पत्रकार असें लिहितात कीं मि. हरबर्ट ग्लाडस्टन एम्. पी. हे येत्या कलकत्त्यास होणाऱ्या कांग्रेसचे अध्यक्ष होण्याचा संभव आहे.

हल्लीं इंग्रजी भाषा बोलणार लोक जगा मध्यें साडे नाराकोटी आहेत असें ह्मणतात. कालेंकरून साऱ्या जगांतील लोकांची हीच भाषा होईल असें तिच्या अभिमान्यांचें आन ह्मणणें आहे.

हिंदुस्थानांत प्रत्येक माणसीं करांचें मान ४ शिलिंग ६ पेन्स ( ३ रु. ) आहे.

अमेरिकेंत एका स्त्रीप एक चमत्कारिक आकृतीचें मूल झालें आहे त्याच्या डोक्यास पुढल्या अंगास तसेंच मागल्याही अंगास अशीं दोन तोंडें आहेत ह्या पैकीं एक तोंड रडत असतें तरी दुसरें तोंड खुशाल हंसतें. दोन्ही तोंडें मिळून घशाची नळी एकच आहे. या मुलास हात एकच आहे; पण पाय तीन आहेत. दोन पुढचे आंगास आणि तिसरा पाय मागें शेपटी सारखा आहे. हें मूल जिवंत आहे असें ह्मणतात.

ढळढळीत चारा चुका—आपल्याच मताप्रमाणें खऱ्या खोट्याची यत्ता ठरवून ती प्रमाणें लोकांना चांगले अथवा वाईट ठरविणें; आपल्या ऐष आरामा वरून लोकांच्याषों गणना करणें जगांत एक मत व्हावें ह्मणून इच्छिणें. तरुण मनुष्य अनुभवी व न्यायी असतील असा अजमास करणें क्षुल्लक गोष्टींत आपला हेका न सोडणें. स्वतः केलेलें काम अगदीं बरोबर असावें असें मानणें; जें नीट करितां येणार नाहीं त्या बद्दल आपल्यास व दुसऱ्याला त्रास करून घेणें. दुसऱ्याच्या स्वभाविक खोडी बद्दल त्याला क्षमा न करणें. आपणा स्वतःला जी गोष्ठ करितां येत नाहीं ती अशक्य मानणें, आपणा स्वतःलाच समजतें तेवढेंच खरें मानणें, आणि सर्वांत मोठी चूक आपल्या काळच्या लोकां पुरतेंच श्रम करणें आणि पुढील लोकां साठीं, आपलें आयुष्य क्षणिक आहे हें न समजून कांहींच न करणें

विलायतेंत रोमन क्याथालिग धर्माचें एक प्रसिद्ध वर्तमानपत्र आहे. त्यांत कित्येक धर्माच्या लोकांत नीतिमत्तेचें प्रमाण कसें काय आहे तें दिलें आहे. ते असें.

बौद्ध धर्मी ३७८७ मनुष्यांत १ अनीतिमान
हिंदुधर्मी १३६१ मनुष्यांत १ अनीतिमान
मुसलमानधर्मी ८५६ मनुष्यांत ३ अनीति.
नेटीवख्रिस्ती ७०९ मनुष्यांत १ अनीतिमा.
युरेशियन ५०९ मनुष्यांत १, अनीतिमान.
युरोपियन २७४ मनुष्यांत १ अनीतिमान.

या आकड्यांमध्यें आपणा हिंदुधर्मी लोकांचा नंबर दुसरा लागलेला पाहून आपणास आपल्या धर्माच्या मोठेपणा बद्दल अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. यांत ख्रिस्ती धर्माची मात्र नीति रक्षणाचे कामीं खूर नाचक्की दिसते आहे. आणि विलायचच्या ज्या ख्रिस्ती धर्मी पत्रांत वरील आंकडे आले आहेत त्यांतच त्यां खालीं पुढें दिल्याप्रमाणें उल्लेख आहे, "नेटीवास जरी आह्मी बाटविलें तरी नीतिकडील त्यांचा कल आमच्यानें कमी करवला नाहीं. तेव्हां एक दोन पिढ्या पर्यंत नेटीव लोकांस बाटवून त्यांची नीति बिघडविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां आपण आपली सामाजिक स्थिति सुधारावी हें बरें. हिंदूनीं आमची नीति सुधारण्या करितां विलायतेस मिशनरी पाठवावे इतकी त्यांची योग्यता थोर आहे." होय, आहे थोरपण मानतो कोण? कारण आह्मी परतंत्र ना!

दरकमी करण्याचा विचार सदर्न मराठा रेलवेचे अधिकारी उतारू पासून दर मैली २॥ पै भाडे घेतात ते कमी करून २ पै घ्यावे असा कांहीं विचार चालू असल्याचें समजतें. ही गोष्ट खरी असल्यास त्या रेलवेच्या उतारूस बरीच सोय होईल.

विश्वविद्यालयास मोठी देणगी मुंबईचे श्रीमान भाटे गृहस्थ सर मंगळदास नथुभाई यांणीं आपल्या मृत्युपत्रांत मुंबई युनिव्हर्सिटास बरीच मोठी रक्कम द्यावी असें लिहिलें आहे. ती सुमारे ८ लक्ष तरी होईल असें म्हणतात. हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयास एवढी मोठी देणगी आजपर्यंत कधींच मिळाली नाहीं.

संपत्तीची तुलना—अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्सची संपत्ति गेल्या १० वर्षांत ७१,४५-५०,००,००० डालर झाली. म्हणजे ती १८,००,००,००,००० म्हणजे शेंकडा ४२ इतकी वाढली युनायटेड स्टेट्सच्या संपत्तीची दर माणशीं वांटणी केली तर १००० डालर बसते. सन १८८५ सालीं ग्रेट बिटनची संपत्ति ५०,००,००,००,००० डालर होती तिची वर्गत केली तर दरमाणशीं १-३४५, स्काटलडांत १२१५, आणि आयर्लंडांत ५६५ डालर संपत्ति आहे असें होते. ग्रेट ब्रिटनचा दर माणूस २० डालर व युनायटेड स्टेट्स मधील प्रत्येक माणूस १२ $\frac{१}{२}$ डालर सरकार देणें देतो. फ्रान्सची संपत्ति ३६,००,००,००,००० डालर आहे.

गु० गु

निजाम सरकारानें विलायतेस अभ्यास करण्या- करितां जाणाऱ्या विद्यार्थ्यां साठीं ज्या चार स्कालरशिपा काढल्या आहेत, त्याकरितां २४ उमेदवार हल्लीं पुढें आले आहेत. त्याची थोड्याच दिवसांत परीक्षा घेऊन त्यांत पास होतील त्यापकीं कोणास स्कालरशिपा द्यावयाच्या तें ठरेल. या शिवाय निजाम साहेबांनीं हे इनाम कमिशनर सय्यद महमद अली बेलग्रामी यांस शेतकी संबंधे अभ्यास करण्याकरितां दरसाल ३०० पौंड वेतन ठरवून इंग्लंडास जाण्याची परवानगी दिली. या शिवाय दुसऱ्याही कित्येक खात्यावरील अमलदारांस विलायतेस जाण्याची परवानगी मिळाली आहे. परंतु उमेदवाराचें वय चाळिशाच्या पलीकडे असूं नये अशी त्यांला एक शर्त ठेविली आहे. निजाम साहेबाचे हे प्रयत्न फार चांगले आहेत त्याचा कित्ता इतर संस्थानिकांनीं अवश्य घ्यावा.

रबराचें रान—मि. स्व्यानले ह्यांना त्यांच्या आफ्रिकेंतील प्रवासांत इंग्लंडदेशा एवढें एक विस्तृत अरण्य सांपडलें व त्या अरण्यांत ज्याचे पासून इंडिया रबर तयार होतें असेंच सर्व वृक्ष आहेत. दी० बं०

पार्लमेंट मध्यें ता. १४ रोजी हिंदुस्थानच्या जमा खर्चांचा आंकडा वाचून दाखविण्यांत आला. याच्या संबंधानें वादविवाद चालला असतांना हिंदुस्थानावर कराचें ओझें अतिशय थोडें आहे असें सर रिचर्डटेंपल यांनीं ह्मणून दाखविलें.

आस्ट्रियामध्यें एका चांभारानें आपल्या बायकोचा फार निर्दयपणानें खून केला. पहिल्यानें लग्नाच्या वेळेस त्या उभयतांचें वय २५ वर्षांचे होते. नंतर यांना ५।६ मुलगे झाले आणि या चांभाराचा धंदाही फार चालला. पुढें त्याला दारूचा फार नाद लागल्यामुळें त्याच्या बायकोनें त्याच्या पासून निराळे होण्याचा बेत केला. शेवटीं एक दिवस त्यानें दारूसाठीं आपल्या मुलांचे कपडे विकले, तेव्हां त्याची बायको मुलांसह त्याच्या पासून निराळी राहिली. त्यावरून त्याला राग येऊन त्यानें वरील कृत्य केलें. पुढें त्याला फाशीची शिक्षा झाली पहा दारूचा नाद कसा भयंकर व घातक आहे! सु० प०

## अकोले बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००।= |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००= |
| सुवर्ण.... १९ | रुपे | | १०९ |
| आळशी खंडीस ८३ | उडीद | | ६० |
| गहू काटे ६०. | बनशी | | ६५ |
| जवारी नवी ३७ | चणे | | ६० |
| सर्की ३॥। | मीठ | | ४। |
| तूप ९।= | तेल | | ४॥।= |

सट्याचे भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४३ |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५७ |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ७९०= |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५७॥ |
| सर्की | वै. नवे सालाची | १९४७ | ३॥-॥ |


## जाहिरात.

विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

किंमतीशिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

स्त्री शिक्षण व इतिहास वगैरे पुस्तकांस मोठमोठ्या विद्वानांनीं उत्तम असे आपले पुष्कळ अभिप्राय दिलेले आहेत त्या पैकीं खालचा हा एक आहे.

Mr. G. M. Sathe, Registar of native publications in his report to Govt. for the year 1888 says:— "Among the Historical works of the year, History of the native states, chapter I, by Mr. Limaye, gives much useful information."

### १ सौभाग्य मंदीर.

[ भाग पहिला. ] किंमत ०१२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषय .

१ स्त्रियांची योग्यता, २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म, ३ स्त्रियांचें भूषण, ४ स्त्रियांचें दूषण ५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी, ६ स्त्रियां वरील कांहींविशेष प्रसंग, ( पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी ) ७ शांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रांस उपदेश, १३ शकुंतलेचें राजसभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मी गर्व परिहार, १६ रुक्मिणीची पत्रिका, १७ सिता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनाचा मोठेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा मनोरंजक संवाद २४ स्त्रियांचें परावलंबन

२ स्त्री शिक्षण ज्ञानमाला.... .... ....०१२

या पुस्तकांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रियांस वाचण्यास योग्य असे पुष्कळ विषय निबंधरूपानें दिले आहेत.

३ संसार दर्पण.... .... .... ....०१०

याही पुस्तकांत स्त्रियांच्या संबंधानें बोधपर असें पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय आहेत.

४ मुलींची सासरीं वागणूक.... .... ....०६
५ सासुरवास चंद्रिका. ( पूर्वभाग ) ०७
६ सदरचा ( उत्तर भाग. ) .... ....०५

इतिहास विषयक पुस्तकें.

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास.......०६
२ श्री सेतुबंध रामेश्वर वर्णन........०२

नेटिव राजांचा इतिहास

( भाग पहिला. ) किं ०१४ आणे.

खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर ४ किसनगड, ५ धोलपूर, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोटा, ९ टोंक, १० करौली, ११ शिरोही, १२ जेसलमिर, १३ रेवा १४ उर्वा किंवा तेहरी, १५ दतिया, १६ सावन्तुर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास २१ जावरा.

नेटिव राजांचा इतिहास.

( भाग दुसरा ) किंमत १२ आणे.

यांत ६ संस्थानांचा इतिहास आहे.

१ उदेपूर. २ जयपूर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर, ६ जव्हार.

मनोरंजक विषयांचीं पुस्तकें.

१ संगीत गोपिचंद नाटक.... .... ... ०९
२ गारुडी लोकांचा खेळ.... .... .... ०६
३ स्त्रियांची मंगल कार्यें अथवा डोहाळे जेवण आणि हळदी कुंकू. .... .... ....०६
४ स्त्रियांचें नेत्र कटाक्ष.... .... .... ०३
५ न्हाणवली आणि ऋतुशांती.... .... ०१
६ स्वतंत्र विधवा व त्यांच्या तरुण मुली०१
७तरुण बायको अथवा स्त्रियांची स्वतंत्रता .... .... ........०१
८ तरुण स्त्रियांची मौज.................०१
९ सावित्री आणि पुरुषोत्तम अथवा अनाचाराचा परिणाम ........०५
१० बकावली.............................१०४

शाळांतील लहान मुलांस उपयोगी पडणारीं पुस्तकें.

१ अंकगणितसार ( भाग पहिला. ) ०३
२ तोंडचे हिशेब ( भाग दुसरा. ) ०१०२
३ हिंदुस्थानचा भूगोल..................०१
४ महाराष्ट्र देशाचा इतिहास............०१
५सदरची जंत्री ............................०१
६अंकलिपी. ( सचित्र. )................०१०६

या शिवाय आह्माकडे आणखी दुसऱ्या तऱ्हेची पुस्तकें मिळतील व्यापारी लोकांस चांगले कमिशन देऊं

हीं सर्व पुस्तकें उमरावती येथें "प्रमोदसिंधु" छापखान्यांत व खालीं सही करणार यांचे कडे रोख किंमतीनें अगर व्हाल्युपेबलनें मागविलीं असतां पाठविलीं जातील.

हि० जी० लिमये.

पत्ता:— कांदेवाडी मुंबई गिरगांव पोष्ट.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.